रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक ३१५
www.ramprahar.com

सोमवार, २ जून २०२५ ◆ पाने २४ ◆ किंमत ₹२

**विशेष संपादकीय**

## आज दिवस दसरा-दिवाळीचा!

बघता बघता रामप्रहर दैनिकाला १७ वर्ष झाली. बघता आमच्या सर्वांचे कुटुंबप्रमुख आदरणीय रामशेठ अमृतमहोत्सवी वर्षात आज पाऊल ठेवत आहेत. रामप्रहर परिवाराला, रामप्रहरमधील प्रत्येक सदस्याला आणि रामप्रहरच्या असंख्य वाचकांना आजचा दिवस एका व्यक्तिचा जन्मदिन नव्हे; तर दसरा-दिवाळीच्या आनंदाचा दिवस वाटतो, कारण एका व्यक्तिने आणि त्या व्यक्तिच्या कर्तृत्वाने असंख्य तरुणांची जीवने उजळून गेली आहेत. कालचा कार्यकर्ता आजचा नेता बनला आहे. कालचा छोटा व्यवसायिक आजचा मोठा व्यवसायिक बनला आहे आणि रामशेठ यांनी उभ्या केलेल्या शिक्षण संस्थांमधून सर्व जाती-धर्माच्या असंख्य विद्यार्थ्यांना शिक्षणाची दारे सताड उघडी करून दिली गेली. रामशेठ यांच्या शिक्षण संस्थेमधून उच्चविद्याविभूषित होऊन आज जगभर त्यांचे असंख्य विद्यार्थी आहेत आणि ते कर्तृत्वाच्या शिखरावर आहेत. रामशेठ यांच्याप्रमाणे त्यांच्या पालकांचाही आजचा दिवस हा दसरा दिवाळीसारखा आहे, कारण यातील असंख्य विद्यार्थी वर्षाची शाळेची फी भरू शकत नव्हते. त्यांचे पालक अस्वस्थ होते. त्यांना रामशेठ आधारवडासारखे वाटतात. रामशेठ यांनी अशा असंख्य विद्यार्थ्यांना फी नाही म्हणून त्यांचं शिक्षण कधीच अडविले नाही. रामशेठ यांच्या या दातृत्वामुळेच असंख्य विद्यार्थी शिकले, मोठे झाले आणि ते आजही त्यांची कृतज्ञता व्यक्त करतात.

रामशेठ यांची उपजतच जीवनशैली बनली आहे. 'या कठीण परिस्थितीचा सामना करून मी मोठा झालो' ती परिस्थिती ते कधीच विसरले नाहीत. त्यामुळे रयत शिक्षण संस्थेच्या सातारा येथील नवीन कॉलेज इमारतीचे काम असो किंवा मोखाडासारख्या आदिवासी भागात महाविद्यालय उभे करणे असो, रामशेठ यांनी या जबाबदाऱ्या स्वीकारल्या, पार पाडल्या. त्यामुळेच अशा या त्यांच्या समाजाप्रती असलेल्या कृतज्ञतेमुळे त्यांचा जन्मदिन हा व्यक्तिचा किंवा कुटुंबाचा आनंदाचा दिवस न राहता साऱ्या समाज जीवनाला या आनंदाचा स्पर्श जाणवतो आणि म्हणून उत्स्फूर्तपणे आज हजारो लोकं येऊन भेटून जातात. रामप्रहर परिवारातील आम्ही सर्व सदस्य एका आवाजात आज आमच्या कुटुंबप्रमुखांना शुभेच्छा देताना म्हणतो आहोत....

**'तुम जिओ हजारो साल...**
**साल के दिनहो पचास हजार...'**

# अमृत महोत्सवी वर्षात पाऊल



**पाऊणशेची उमर गाठली**
**शेतकऱ्यांशी इमान राखूनी**
**'रयते'चे ऋण मनी ठेवले**
**माय-बापाच्या ऋणात राहूनी!**

# 'कृतज्ञ मी..कृतार्थ मी..'

बघता बघता...७४ वर्षे कशी गेली समजलेही नाही. काळाचा वेग अफाट आहे. आज ७५व्या वर्षात पाऊल ठेवताना... कुठून सुरुवात झाली आणि कुठे येऊन पोहचलो आणि या प्रवासात सदैव मनामध्ये एकच विचार होता की, सामान्य माणसांसाठी आपल्याला काय करता येईल? गेल्या ५० वर्षात त्यासाठी जे काही केले, ते जनतेसमोर आहे. जे चांगले वाटते ते चांगले झाले आहे. तोच त्या माय-बाप जनतेचा आशीर्वाद आहे.

या ५० वर्षाच्या सामाजिक, सार्वजनिक जीवनात त्या त्या वेळेचे कार्यकर्ते, नेते आणि जनतेने जे अतोनात प्रेम दिले त्याचे ऋण विसरता येणार नाही. त्यामुळे 'कमवा आणि शिका' योजनेतून शिकलेला 'रयत'चा एक विद्यार्थी आयुष्यात काही करू शकला हा कृपेचा आशीर्वाद कर्मवीर अण्णा, माझे आदरणीय माता-पिता आणि पित्यासमान असलेले माझे सासरे स्व. जनार्दन भगत, जीवाला जीव देणारे कार्यकर्ते या सर्वांच्या बद्दलची मनस्वी कृतज्ञता आज मनामध्ये तुडूंब अशी दाटून आलेली आहे. काही भावना शब्दांच्या पलिकडे असतात. त्याचे समाधान हे त्या व्यक्तिला जाणवत असते.

आज मी त्याच भूमिकेत आहे. अजूनही खूप काम करायचे आहे. अजूनही खूप पुढे जायचे आहे. सर्वांना बरोबर घ्यायचे आहे. व्यवसाय, राजकारण आणि समाजकारण या प्रत्येक क्षेत्रात सचोटी, प्रामाणिकपणा आणि तन्मयता या जोरावरच जे काही यश मिळू शकले तोच माझ्या जीवनाचा, फार मोठ्या समाधानाचा आणि आनंदाचा क्षण आहे. माझ्या शिक्षण संस्था, त्यातले असंख्य विद्यार्थी, प्राध्यापक, सामाजिक जीवनातील थोर नेते आणि राजकीय पक्षातील कार्यकर्ते आणि नेते या सर्वांनी जे प्रेम दिले त्या शिदोरीवरच आज रामशेठ उभा आहे. म्हणून आजच्या दिवशी त्या सर्वांबद्दल कृतज्ञता व्यक्त करून जनतेच्या पायावर माझी अनंत लोटांगणे...

**-रामशेठ ठाकूर**







**रामशेठ यांच्या नावातच 'राम'... मग काय कमी...**
**-देवेंद्र फडणवीस**



**रामशेठ...**
**आधारस्तंभ... दीपस्तंभ...**
**-नितीन गडकरी**



**'रामशेठ म्हणजे दातृत्वाचा अखंड वाहणारा झरा'**

(पान क्र. ११ व १३ वर..)



जनसामान्यांसाठी संघर्षाची
मशाल हाती घेऊन
विकासाची पाऊल वाट
समृध्द करणारे
आमचे आधारस्तंभ..!
02 जून
माजी खासदार, लोकनेते
आदरणीय
श्री. रामशेठ ठाकूर
आपणांस वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा!
मा. कान्हाशेठ ठाकूर
प्रोप्रा. के. एच. ठाकूर
सौ. देवकाबाई कान्हाशेठ ठाकूर
अध्यक्षा, श्रमिक म. मंडळ, न्हावेखाडी, ता. पनवेल
अल्केश बैकर
रोशन ठाकूर
सम्राट ठाकूर
सागर ठाकूर
(सदस्य - ग्रामपंचायत न्हावे)
M/s. K. H. THAKUR
Railway & Govt. Contractor,
P. Way (Track Work), Civil Work
and Suppliers Of Building Material
Off. Gurukripa Apartment, Shop No. 1, Plot No. 123,
Ground Floor, Opp : Telephone Exchange,
Panvel - 410206. Dist. Raigad (Maharashtra)




PARADISE GROUP
Your World. Our Vision.
ISO - 9001: 2015 Certified Organization
MAHARERA NO.
PHASE III - P52000053727
Available on maharera.maharashtra.gov.in
LONDON DREAM,
NOW MUMBAI'S REALITY
10 MINS
CLOSEST TOWNSHIP TO MTHL & NAVI MUMBAI INTL. AIRPORT
NEW TOWER
LLOYDS
Club VEGAS
Artist's Impression
PHASE 1 - READY POSSESSION
SAI
WORLD CITY
PANVEL
PROJECT HALLMARKS
38 Acre Mega Township | G+33 Storeyed Towers | 2, 2.5, 3 & 4 BHK Luxury Homes | Themed Landscaping | 50,000 Sq.Ft. Club Vegas | World–class Amenities
LOCATION ADVANTAGES: Navi Mumbai International Airport - 5 Mins. | Mumbai- Pune Expressway - 2 Mins | Panvel Railway Station - 7 Mins | Delhi Public School (DPS) - 5 Mins
Mumbai Trans Harbour Link - 10 Mins | Jawaharlal Nehru Port Trust (JNPT) - 20 Mins | Close proximity to Schools, Malls, Hotels and Banks - 5 Mins
98330 90000 | www.paradisegroup.co.in | Email: enquiry@paradisegroup.co.in
Disclaimer: All the specifcation, design, facilities, dimensions, etc. are subject to the approval of the respective authorities & developers and would be changed if necessary. The discretion remains with the developers.

रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १७ ◆ अंक ३१५
www.ramprahar.com
सोमवार, २ जून २०२५ ◆ पाने २४ ◆ किंमत ₹२

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे सदैव समाजकल्याणाला प्राधान्य



### भाजप प्रदेश कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण यांचे गौरवोद्गार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

लोकनेते रामशेठ ठाकूर हे दानशूरता आणि लोकहिताचे मूर्तिमंत उदाहरण आहेत. लोकांच्या दुःखात सहभागी होण्याबरोबरच आपल्या वैभवाचा उपयोग त्यांनी सदैव समाजकल्याणासाठी केला आहे, असे गौरवोद्गार राज्याचे माजी मंत्री आणि भाजपचे महाराष्ट्र प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी खांदा कॉलनी येथे अमृतमयी कीर्तन महोत्सवात केले.

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा २ जून रोजी ७४वा वाढदिवस असून ते अमृत महोत्सवी वर्षात पदार्पण करीत आहेत. या वर्षाची सुरुवात संतवाणीच्या गोडव्याने अर्थात अमृतमयी कीर्तन महोत्सव २०२५ने झाली असून त्यानिमित्त गुरूतुल्य कीर्तनकारांचा सत्कार भाजप प्रदेश कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते शनिवारी (दि. ३१) करण्यात आला. त्या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

या सोहळ्याला लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस नितीन पाटील, दीपक बेहेरे, प्रल्हाद केणी, संजय भगत, अनंतमहाराज पाटील, निलेश महाराज तसेच अन्य गुरूतुल्य कीर्तनकार व्यासपीठावर उपस्थित होते, तर हजारोंच्या संख्येने वारकरी संप्रदायातील मंडळी प्रांगणात हजर होती.

रवींद्र चव्हाण यांनी पुढे बोलताना सांगितले की, व्यासपीठ आणि माझ्यासमोर बसलेल्या सर्वांना लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याबद्दल माझ्यापेक्षा नक्कीच अधिक माहिती असेल, परंतु अशी फार कमी माणसं असतात की जी दुसऱ्याच्या दुःखामध्ये सहभागी होतात. पैसा बऱ्याच जणांकडे असतो, पैसे बरेच जण वेगवेगळ्या मार्गातून कमवत असतात, परंतु मला मिळालेले जे वैभव आहे या वैभवाचा मी खरा वाटेकरी नाही, तर हे मला लोकांचे दुःख दूर कमी करण्यासाठी माझ्याकडे येतंय असा विचार करणाऱ्या व्यक्ती फार कमी आहेत. मी पाहिलेले असे दानशूर व्यक्तिमत्व जर कोणत असेल, तर ते लोकनेते रामशेठ ठाकूर आहेत आणि हे मला अभिमानाने सांगावेसे वाटते. अशा थोर व्यक्तींच्या सहवासातूनसुद्धा आपल्याला बरंच काहीतरी शिकता येते. **(पान २४ वर..)**


*लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित अन्य उपक्रमांच्या बातम्या, छायाचित्रे उद्याच्या अंकात...*

### सिंहस्थ कुंभमेळ्यातील अमृतस्नानाच्या तारखा जाहीर

**नाशिक** : प्रयागराज येथील कुंभमेळ्यानंतर आता आगामी सिंहस्थ कुंभमेळा त्र्यंबकेश्वर आणि नाशिकमध्ये २०२६-२८दरम्यान होणार आहे. या पार्श्वभूमीवर रविवारी (दि. १) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंत्री, साधू-महंतांच्या उपस्थितीत नियोजन बैठक झाली. या वेळी कुंभमेळ्यातील अमृतस्नानाच्या तारखा जाहीर करण्यात आल्या. त्र्यंबकेश्वर येथे पहिले अमृतस्नान २०२७मध्ये ३१ जुलै, दुसरे ३१ ऑगस्ट, तिसरे १२ सप्टेंबर रोजी; तर नाशिक येथे पहिले अमृतस्नान २ ऑगस्ट, दुसरे ३१ ऑगस्ट व तिसरे ११ सप्टेंबरला होणार आहे.






# समाजभान जपणारा नेता



**| समाधान पाटील**

प्रतिकूलतेच्या अंधाऱ्या गर्तेतून स्वतःची वाट शोधणं आणि त्या वाटेवर अखंड श्रम करत यशाचं शिखर गाठणं ही खरी कर्तृत्वाची ओळख असते. अशाच संघर्षातून मार्ग काढत रायगडचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी इतिहास रचत यशाचा नवा अध्याय लिहिला आणि यशस्वी झाल्यावरदेखील समाजाशी असलेली नाळ कधी तुटू दिली नाही. उलटपक्षी, त्यांनी आपलं संपूर्ण जीवन जनतेसाठी तन, मन आणि धनाने समर्पित केलं.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांचं बालपण अत्यंत बिकट परिस्थितीत गेलं. सभोवतालच्या समाजाचं कष्टप्रद जीणंही त्यांनी पाहिलं, अनुभवलं. अशा विपरित वातावरणात आई-वडिलांकडून संस्कारांची उत्तम शिदोरी त्यांना मिळाली. त्यातून विचारांचा पाया भक्कम झाला. मग अनेक अडचणी तसेच संसाधनांचा अभाव असूनही 'उठा, जागे व्हा आणि ध्येय प्राप्त होईपर्यंत थांबू नका' या स्वामी विवेकानंदांच्या उक्तीनुसार त्यांनी शिक्षणाच्या जोरावर स्वतःचं जीवन घडवलं आणि इतरांसाठीही ते आयुष्यवाट उजळवत राहिले.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांना जेव्हा पद, प्रतिष्ठा, प्रसिद्धी मिळाली, तेव्हा त्यांनी त्याचा वापर आपल्या वैयक्तिक फायद्यासाठी न करता जनतेच्या कल्याणासाठी केला. सामान्य नागरिकांच्या गरजा, प्रश्न यावर काम करताना त्यांनी कधीही अंतर राखले नाही. लोकशाहीने लोकहित साधणे हेच त्यांच्या कार्याचे ब्रीद आहे.

यशस्वी होणे हे कौशल्य आहे, पण स्वतः यशस्वी होऊन इतरांना यशस्वी करणे हे खरे नेतृत्व आहे आणि लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे जीवन त्याचे ज्वलंत उदाहरण आहेत. त्यांच्या यशात 'मी' कमी आणि 'आपण' अधिक असतो.

सभा असो, समारंभ असो अथवा सर्वसामान्याचे घर; लोकनेते रामशेठ ठाकूर कुठेही असोत त्यांची देहबोली, भाषाशैली आणि आत्मियता ही सामान्य जनतेच्या मनात विश्वास निर्माण करणारी असते. आज ते फक्त माजी खासदार म्हणून ओळखले जात नाही, तर सामाजिक चळवळीचे आधारस्तंभ, लोकहितासाठी झटणारे लोकनेते आणि युवकांमध्ये नवे विचार पेरणारे मार्गदर्शक म्हणून ओळखले जातात.


बऱ्याचदा लोक यशस्वी झाले की समाजापासून दूर होतात, परंतु लोकनेते रामशेठ ठाकूर यांची जनतेशी साथ कधीच सुटली नाही. ते आजही गावोगावी फिरतात, लोकांच्या समस्या ऐकतात, सुख-दुःखात सहभागी होतात. शिवाय त्यांच्या घराचे दरवाजे सामान्य माणसासाठी नेहमी उघडे असतात. शेतकरी, कामगार, विद्यार्थी कोणीही त्यांच्याकडे सहज येऊ शकतो. नम्र स्वभाव, संवाद साधण्याची कला आणि निर्णयक्षमता याद्वारे ते सर्वांना आपलेसे करतात.


लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सत्ता, यश, नाव, लोकप्रियता सर्व काही मिळवले, पण त्यांच्यात कधीही अहंकाराची झलक दिसली नाही. त्यांनी जे काही मिळवले त्याचा उपयोग समाजासाठी केला. सध्या ते राजकारणात सक्रिय नसले तरी त्यांचे कार्य हे प्रत्येक क्षेत्रात प्रभाव टाकणारे आहे. आजही त्यांच्या घरी सामान्य माणूस आपले दुःख घेऊन जातो आणि समाधानाने परततो. हीच या लोकनेत्याची खरी ओळख आहे.

समाजात आज जेव्हा निस्वार्थ सेवेची उणीव जाणवते, तेव्हा लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्यासारखी व्यक्तिमत्वं जनतेला आशेचा किरण देतात. त्यांनी जनतेचा विश्वास मिळवला आणि तो कायम राखला. त्यांच्या कार्यपद्धतीत सेवा ही केंद्रस्थानी राहिली आहे.

खरा नेता तोच, जो यशातही माणुसकी विसरत नाही आणि संकटातही साथ सोडत नाही. लोकनेते रामशेठ ठाकूर यांनीही स्वतःचं आयुष्य समाजहितासाठी अर्पण केलं. त्यांचं एकूणच जीवन हे परिश्रम, संघर्ष, शिक्षण, सामाजिक कार्य आणि सेवाभाव यांचा एक उत्तुंग व प्रेरणादायी प्रवास आहे. आजही ते अहोरात्र कार्यरत असतात. अन्याय-अत्याचाराविरोधात आवाज उठवून सर्वसामान्याला कसा न्याय मिळेल याचा प्रयत्न करीत असतात.

अडथळ्यांच्या पर्वतांवर न डगमगता यशाचे उंच शिखर पादाक्रांत करणारे आणि अफाट संपत्तीच्या अधिष्ठानातही सामाजिक बांधिलकीचे भान न विसरता लोकहितासाठी सदैव झटणारे लोकनेते रामशेठ ठाकूर यांची वाटचाल प्रत्येकाला प्रेरणा आणि ऊर्जा देणारी आहे. अशा या कर्तृत्ववान, दूरदर्शी आणि महनीय नेत्याला उदंड आयुष्य लाभो आणि त्यांच्या हातून समाजाची अविरत सेवा घडत राहो या ७४व्या वाढदिवसाच्या आणि अमृत महोत्सवी वर्ष पदार्पणानिमित्त त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा!






# अनासक्त कर्मयोगी



गरिबीत जन्मास येऊनही आईवडिलांच्या संस्कारांची शिदोरी सोबत घेऊन परिश्रमपूर्वक शिक्षणाची कास धरणारे व अध्यापक पदापासून उद्योजकतेपर्यंतची भरारी घेणारे लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याविषयी पत्रकारितेतील सुरुवातीच्या दिवसांपासून ऐकून होतो. पण जेव्हा त्यांच्याशी थेट व्यक्तिगत संपर्क आला तेव्हा प्रथमदर्शनी भेटलेले, जाणवलेले रामशेठ ठाकूर असे होते- हातात कोणतीही ग्रहखड्याची अंगठी नाही, गळ्यात गंडा-दोरा नाही. पण व्यक्तिमत्वात ओतप्रोत भरलेला आत्मविश्वास तसेच भूतकाळाची जाण, भविष्याचा अंदाज आणि वर्तमानाचा वेध या तिन्हींचा आधार घेऊन ठामपणाने निर्णय घेणाऱ्या रामशेठ यांच्याविषयी मनात अत्यंत आदराची भावना निर्माण झाली. आपल्या अतिशय तीक्ष्ण आणि चौफेर निरीक्षण शक्तीच्या बळावर वर्तमान स्थिती आणि भविष्याचा अंदाज यांची सांगड घालत योग्य आणि अचूक निर्णय घेणे हा त्यांचा स्थायी भाव आहे हे प्रकर्षाने जाणवले. कोणालाही न दुखावता आवश्यक तिथे ते कठोर निर्णयही सहज घेतात. निर्णय घेताना शिताफीने सर्व बाजूंचा साकल्याने विचार करण्याची त्यांची कार्यशैली आसपासच्या सगळ्यांनाच खूप काही शिकवून जाणारी. पण त्यांचे सर्वात मोठे वेगळेपण म्हणजे, आपल्याकडे मदतीच्या अपेक्षेने येणाऱ्या कोणालाही त्याची जातपात, धर्म, पक्ष न विचारता शक्य तेवढी मदत करण्याची, ती मदत करणे हाच आपला धर्म मानण्याची त्यांची निरपेक्ष वृत्ती.

२०१६ मध्ये मी 'मल्हार नेटवर्क'च्या म्हणजे 'दैनिक रामप्रहर' आणि 'मल्हार टीव्ही'च्या संपादक पदाची जबाबदारी स्वीकारली. म्हणजे एव्हाना जवळपास नऊ वर्षे मी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली काम करतो आहे. पत्रकारितेतील २७ वर्षांच्या दीर्घ वाटचालीनंतर 'मल्हार नेटवर्क'कडे मी आलो. पण तोवर मी जिथे-जिथे काम केले त्यातले सर्वोत्तम ठिकाण म्हणजे 'मल्हार नेटवर्क' आणि अत्यंत आदर्श व उत्तम मालक म्हणजे लोकनेते रामशेठ ठाकूर साहेब असे आवर्जून नमूद करावेसे वाटते. रूजू झाल्यानंतरच रामशेठ यांना मी म्हटले की, आपण फार उशीरा भेटलो. त्यावर ते म्हणाले होते, जशी वेळ असते, तशी भेट होतेच.

मदतीच्या अपेक्षेने संपर्कात आलेल्या प्रत्येकाचीच स्थिती-परिस्थिती याचा अंदाज घेऊन त्या व्यक्तीला सहकार्य करायचे आणि कोणालाही नाराज करायचे नाही, हे त्यांचे धोरण सुरुवातीपासूनच जाणवले. परंतु अतिस्तुती करणारे कुणी समोर आले तरी शेठ अशी भलामण करणाऱ्यांना शांत व संयमी प्रतिक्रिया देत असतात हेही पाहिले. स्वत:बद्दल अवास्तव कल्पना बाळगणारी नेतेमंडळी सामाजिक

**देवदास मटाले,**
**मुख्य संपादक, दैनिक राम प्रहर**

जीवनात अनेकदा दिसली आहेत. परंतु आपण काय करू शकतो याची खात्री बाळगून, एकदा ठाम निर्णय घेतला की मग 'शेंडी तुटो वा पारंबी' या न्यायाने अखेरपर्यंत ती गोष्ट तडीस नेल्याशिवाय शेठ कधीही स्वस्थ बसत नाहीत. त्यांच्या या निर्धाराचे दर्शन आसपासच्या सगळ्यांनाच वेळोवेळी घडत असते.

दोन वेळा शेतकरी कामगार पक्षातर्फे खासदार होऊन राष्ट्रीय स्तरावर काम केल्यानंतर बहुदा त्यांच्या हे ध्यानात आले असावे की, शेकाप हा देशभरातला एक छोटा पक्ष आहे. संसदेत या पक्षाला बोलण्यासाठी एक-दोन मिनिटेच मिळतात. तरीही त्यांची पक्षनिष्ठा कायम होती. शेकापच्या वरिष्ठ नेत्यांना त्यांनी वेळोवेळी सांगितले की, एखाद्या मोठ्या पक्षात विलीन झाल्याशिवाय आपल्याला लोकांच्या समस्या सोडवता येणार नाहीत. परंतु शेकापच्या नेतृत्वाने त्यांच्या या प्रस्तावाला मान्यता दिली नाही. दुसऱ्यांदा खासदार झाल्यानंतर मात्र शेठनी जाहीरच करून टाकले की, यापुढे मी निवडणूक लढवणार नाही. आणि आपला हा शब्द त्यांनी आजतागायत पाळला आहे.

दरम्यानच्या काळात ते काँग्रेसमध्ये गेले. पुढे त्यांनी व त्यांचे सुपुत्र आमदार प्रशांत ठाकूर यांनी स्थानिक लोकांच्या मागणीनुसार टोलचा मुद्दा लावून धरला व याच मुद्यावर अखेरीस काँग्रेसही सोडली आणि भाजपला साथ दिली. त्यामुळे खारघरचा टोल हा सर्व छोट्या वाहनांसाठी मुक्त झाला.


लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आतापर्यंत जी जी सार्वजनिक कामे केली ती सारी लोकोपयोगी अशीच राहिली आहेत. त्यांनी शेकापला दिलेला सल्ला शेकाप नेत्यांनी मानला नाही. आज शेकापचा रायगडमधील एकही नेता विधानसभा, विधान परिषद आणि केंद्रातही नाही. तसेच शेकापची बडी नेते मंडळी आता मोठ्या प्रमाणात भाजपात सामिल झाली आहेत.

रायगडच्या राजकारणात लोकनेते रामशेठ ठाकूर यांना एकाकी पाडण्याचा प्रयत्न त्यांच्या काही विरोधकांनी कायम केला. मात्र परिणामस्वरूपी ही मंडळीच राजकारणातून दूर सारली गेली.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे व्यक्तिमत्त्व आणि नेतृत्व राजकीय वाटचालीविषयीच नव्हे तर एकंदर जीवनविषयक दृष्टिकोनाविषयीही खूप काही शिकवून जाणारे आहे. ठाकूर कुटुंबाप्रमाणेच आमच्या 'मल्हार नेटवर्क'चेही ते कुटुंबप्रमुखच आहेत. अशा दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक लोकनेते रामशेठ ठाकूर यांना त्यांच्या अमृतमहोत्सवी वर्षातील पदार्पणाच्या माझ्याकडून तसेच 'मल्हार नेटवर्क'च्या सर्व सहकाऱ्यांच्या वतीने मनापासून शुभेच्छा.

■■■






# अफाट कर्तृत्वाचे महामेरू

**दीपक म्हात्रे, ज्येष्ठ पत्रकार**

लोकनेते रामशेठ ठाकूर दोन वेळा रायगड जिल्ह्याचे खासदार होते. त्यांची आणि माझी पहिली भेट १९९१ साली झाली. त्या वेळी खांदा कॉलनी, पनवेल येथे आगरी शिक्षण संस्थेच्या वतीने सुरू करण्यात येत असलेल्या शैक्षणिक संकुलाला काही आर्थिक मदत मिळण्याच्या दृष्टीने आम्ही संस्थेचे पदाधिकारी त्यांना भेटलो होतो. तेव्हा श्याम म्हात्रेंनी माझी ओळख करून दिली होती. त्यानंतर अनेक कारणांनी व वेगवेगळ्या कार्यक्रमांच्या निमित्ताने भेटी होत गेल्या. स्नेह वाढला आणि त्यातून आमच्या दोघांमध्ये एक ऋणानुबंधाचे नाते निर्माण झाले.

पुढे १९९८ साली लोकांच्या आग्रहास्तव रामशेठ यांनी शेकापतर्फे रायगड जिल्ह्यातून लोकसभेची निवडणूक लढविली. या निवडणुकीच्या वेळी त्यांना संपूर्ण रायगड जिल्ह्यातील सर्व पत्रकारांशी संपर्क साधणारा, त्यांना निवडणुकीच्या बातम्या वेळच्या वेळी देणारा, पत्रकार परिषदा आयोजित करून त्यांच्याविषयी आणि निवडणुकीविषयी माहिती देणारा अनुभवी पत्रकार प्रसिद्धी प्रमुख म्हणून हवा होता. ही जबाबदारी त्यांनी माझ्यावर टाकली. सोबत पनवेल, नवी मुंबईतील काही पत्रकार होते. रामशेठ ठाकूर यांनी काहीना काही कारणास्तव जिल्ह्यात अनेकांना आर्थिक मदत केली होती. त्यामुळे त्यांच्या नावाभोवती जिल्ह्यात दानशूरपणाचे एक वेगळेच वलय निर्माण झाले होते. त्याचा फायदा या निवडणुकीत त्यांना झाला. ते निवडून आले व खासदार झाले. ही लोकसभा अल्पजीवी ठरली आणि १९९९ साली पुन्हा लोकसभेच्या मुदतपूर्व निवडणुका जाहीर झाल्या. खासदार म्हणून रामशेठ ठाकूर यांना जो १३ महिन्याचा अल्पकाळ मिळाला त्या अल्प काळातही त्यांनी रायगड जिल्ह्यात अनेक विकासाची कामे केली. राज्य आणि केंद्र सरकारकडून लाखो रुपयांचा विकास निधी आणून अनेक महत्त्वपूर्ण प्रकल्प राबवले. स्थानिक प्रकल्पग्रस्तांना नोकऱ्या मिळाव्यात यासाठी प्रसंगी भव्य मोर्चे काढले.

केंद्र सरकारने त्यांची खासदार म्हणून केंद्रीय गृहखात्याच्या स्थायी समितीचे सदस्यपदी नेमणूक केली तसेच महाराष्ट्र टेलिकॉम सल्लागार समिती, केंद्रीय नागरी विकास वाहतूक समिती, रायगड जिल्हा टेलिकॉम सल्लागार समिती अशा विविध समित्यांवर त्यांची नेमणूक केली. खासदार म्हणून आगरी समाज परिषदेच्या वतीने मुंबईच्या छबिलदास हायस्कूलच्या सभागृहात लोकनेते दि.बा. पाटील यांच्या हस्ते त्यांचा भव्य सत्कार आम्ही घडवून आणला. खासदार म्हणून रामशेठ यांनी केलेल्या कामाचा कार्य अहवालही जाणीव नावाचा खास अंक मी काढून मतदारांसमोर आणला. या अंकाचे प्रकाशन रायगड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष मा. प्रभाकर पाटील यांच्या हस्ते पेण येथे समारंभपूर्वक केले.

रामशेठ खासदार झाल्यानंतर पहिल्याच दिवाळीपूर्वी त्यांना मतदारांशी संपर्क साधणारी एक सुंदर कल्पना सुचवली. त्यांनी ती मान्य केली आणि त्या दिवशी दिवाळीच्या पहाटे साऱ्या रायगड जिल्ह्यात प्रत्येकाच्या घरोघरी सुगंधी उमटण्याची पाकिटे देऊन त्यांनी सर्वांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या. पुढे ही कल्पना रामशेठ यांनी १० वर्ष राबविली.

१९९९ साली रामशेठ दुसऱ्यांदा लोकसभेच्या निवडणुकीला उभे राहिले. तेव्हाही प्रसिद्धी प्रमुखाची जबाबदारी त्यांनी माझ्यावर सोपवली आणि ती जबाबदारी मी प्रामाणिकपणे व अतिशय मेहनतीने पार पाडली. तीही निवडणूक फार अटीतटीची झाली. रामशेठ विजयी झाले. जिल्ह्यात कार्यकर्त्यांनी मोठा आनंदोत्सव साजरा केला. ही पाच वर्षे खासदार म्हणून जिल्ह्यात क्रियाशील राहून रामशेठ यांनी भरपूर विकासाची कामे केली. अनेकांना नोकऱ्या लावल्या, मच्छीमार बांधवांचे प्रश्न मार्गी लावले, त्यांना सरकारकडून लाखो रुपयांची आर्थिक मदत मिळवून दिली. लोकसभेत रायगड जिल्ह्यातील सामान्य जनतेच्या अनेक प्रश्नांना वाचा फोडली व ते सोडविण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. नव्या मुंबई विमानतळाचा प्रश्न त्यांनी २९ फेब्रुवारी १९९९ साली लोकसभेत उपस्थित केला होता. अशा प्रकारे खासदार म्हणून त्यांनी उत्तम काम केले.

पुढे २००६ साली रामशेठ यांनी मला केबल नेटवरून सुरू केलेल्या चॅनल वन या न्यूज चॅनलच्या संपादकपदाची जबाबदारी सोपवली. दरम्यान, स्वतःचे वृत्तपत्र असावे हा विचार मी त्यांना अनेक वर्षांपासून बोलत होतो. तो त्यांनी मनावर घेतला आणि त्या कामाला सुरुवातही केली. दै.रामप्रहर सुरू झाला आणि पहिल्या अंकाचे प्रकाशन मुंबई विद्यापीठाच्या ऐतिहासिक सभागृहात तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या हस्ते झाले. त्या वेळी अनेक मंत्री उपस्थित होते.

अशा प्रकारे विविध कार्यक्रम, उपक्रमांद्वारे रामशेठ ठाकूर यांच्याशी असलेले जिव्हाळ्याचे नाते अधिक दृढ होत गेले. २००१पासून श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळातर्फे महाराष्ट्र पातळीवर सर्वोत्कृष्ट दिवाळी अंक स्पर्धा भरवली जाते. या स्पर्धेसाठी अंक गोळा करणे, त्यांचे सखोल परीक्षण करण्यासाठी नामवंत परीक्षक नेमणे आणि स्पर्धेचा वेळेवर निकाल जाहीर करणे, पारितोषिक वितरण समारंभासाठी नामवंत साहित्यिक शोधणे, समारंभाची तारीख ठरविणे आदी सर्व गोष्टींची जबाबदारी गेले अनेक वर्षे मी आणि ज्येष्ठ पत्रकार नीला उपाध्ये यांनी सांभाळली आहे. जोडीला श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे कार्यालयीन सचिव अनिल कोळी आहेत. या संबंध वाटचालीत रामशेठ ठाकूर यांचे मार्गदर्शन आणि आमदार प्रशांत ठाकूर यांचे मोलाचे सहकार्य आम्हाला लाभते. गेली काही वर्षे या स्पर्धेला मुंबई मराठी पत्रकार संघाचे सहकार्य लाभले आहे. रामशेठ ठाकूर यांनी पत्रकार संघाला भरघोस आर्थिक सहकार्य दिले आहे.

रामशेठ ठाकूर यांना परदेश पर्यटनाचीही आवड आहे. ते प्रतिवर्षी निरनिराळ्या देशांना भेटी देऊन तेथील सौंदर्यस्थळे, लोकसंस्कृती, लोकभाषा, तेथील स्वच्छता, टापटीपपणा अगदी जवळून न्याहाळतात. दुबईतील बाग–बगीचांचे त्यांना विशेष आकर्षण आहे. अशाच प्रकारची एखादी बाग आपल्या गावी, आपल्या गावकऱ्यांसाठी निर्माण करावी असा विचार त्याच्या मनात आला आणि त्या दृष्टीने त्यांनी कामाला सुरुवातही केली. त्यासाठी स्वतःचे पैसे खर्च केले आणि दिवस–रात्र काबाडकष्ट करून अतिशय मेहनत घेत त्यांनी १३ एकर जागेवर दुबईसारखी विविध फुलझाडांनी नटलेली सुंदर, सुसज्ज अशी बाग त्यांनी निर्माण केली. त्या बागेला लोकांनी राम बाग असे नाव दिले.

या भव्य अशा बागेत लहान मुलांना खेळण्यासाठी विविध प्रकारची साधने, ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळ्याची ठिकाणे, मनोरंजनासाठी सुसज्ज असे व्यासपीठ आणि या सर्वांना साजेसे असे आकर्षक बगीचे त्यांनी बनविले आहेत. संध्याकाळी बगीचाला केलेल्या बहुरंगी दिव्यांच्या रोषणाईने या बागेचे सौंदर्य अधिक खुलून दिसते. त्यामुळे ही राम बाग म्हणजे उरण, पनवेल, नवी मुंबईतील रहिवाशांचे विरंगुळ्याचे एक आवडते ठिकाण झाले आहे. येथे येणारा प्रत्येक जण येथील आनंदी वातावरणात अगदी न्हाऊन निघतो आणि त्याच आनंदात घरी जातो. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर उमटलेले हे आनंदी भाव पाहून रामशेठही सुखावतात. असे हे रामशेठ विकासाची दृष्टी असलेले अफाट कर्तृत्वाचे महामेरू आहेत.




तुमच्या जीवनातील प्रत्येक क्षण आनंद घेऊन येवो,
तुमच्या मायेचा सुगंध जीवनभर असाच पसरत राहो..!
02 जून
माजी खासदार, लोकनेते
आदरणीय
श्री. रामशेठ ठाकूर
साहेब,
आपणांस वाढदिवसाच्या
मनःपूर्वक शुभेच्छा!
शुभेच्छुक
डॉ. मनिष अनंत पाटील
माजी सदस्य, रायगड जिल्हा परिषद

+91 22 41498855
www.hiranandaniexclusive.com

hiranandani communities
a niranjan hiranandani initiative

# HIRANANDANI FORTUNE CITY PANVEL

## 2, 3 & 4 BHK Homes




### TOWNSHIP AMENITIES

Hiranandani Trust School | Medical Center | Landscaped Garden
Pedestrian Friendly Tree - Lined Avenues | Supermarket | Retail Outlets
Restaurants | Shuttle Bus Service | Hakone Gaming Center

The project has been registered via MahaRERA registration numbers: **Jasmine: P52000055578, Mayflower: P52000054617, Marigold: P52000054616** is available on the website https://maharera.mahaonline.gov.in under registered projects. PDPL/ developer secures a credit facility from ICICI Bank and Aditya Birla Finance Limited (collectively, "Lenders"), with Beacon Trusteeship Limited as Security Trustee. This facility is for the development projects at Sector B, Golden Willows ("RZ-02") and Sector D ("RZ-05"). The developer has fully repaid the previous loan managed by Axis Trustee Services Limited for Axis Bank, State Bank of India, and Punjab National Bank Housing Finance Ltd. Upon sale of individual flats in the Projects, Beacon Trusteeship Limited will issue the requisite Release of Charge (ROC) or No Objection Certificate (NOC). *T&C Apply.

JASMINE
MAYFLOWER
MARIGOLD









# ‘पदावर नसलेला मोठा नेता!’

एका १०X१०च्या खोलीत शिकवणीचे वर्ग सुरु करुन त्यातून भारती विद्यापीठ स्थापन करणारे श्री. पतंगराव कदम अकाली गेले. ते जायच्या अगोदर रामशेठ यांच्या एका वर्षीच्या वाढदिवशीच्या निमित्ताने त्यांची मुलाखत घ्यायचे ठरले तेव्हा पतंगराव सांगली महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या गडबडीत होते, पण रामशेठचा विषय काढल्याबरोबर ते पटकन म्हणाले रामशेठशी माझा चांगला दोस्ताना आहे. पतंगराव गेले, पण त्यांनी व्यक्त केलेल्या भावना आजही तशा नि तशा आहेत.

‘रामशेठबद्दल काय बोलू? हा गडी आमच्या रयत शिक्षण संस्थेचा विद्यार्थी आणि मीसुद्धा. आम्ही दोघेही ‘कमवा आणि शिका’ या योजनेतून पदवीधर झालो. ते गरिबीतले दिवस होते, पण चांगले दिवस होते. आताचे दिवस चांगले आहेत आर्थिक दृष्टीने, पण रामशेठचे वैशिष्ट्य असे की या चांगल्या दिवसांत रामशेठना गरीबीचा विसर कधीही पडलेला नाही. मला या माणसाची गंमत वाटते. पक्षात आले तरी कोणतेही पद नको म्हणतात. त्यामुळे मी त्यांना पद नसलेला मोठ्या पदावरचा माणूस असा म्हणतो. या देशातल्या प्रख्यात रयत शिक्षण संस्थेत आम्ही शिकलो. तसे हजारो विद्यार्थी शिकले. ज्या संस्थेत शिकलो त्या संस्थेचे ऋण रामशेठ कधीही विसरले नाही. आम्ही दोघेही रयतच्या मॅनेजिंग कौन्सिलवर होतो. या बैठकीला येताना रामशेठ पनवेलहून त्यांची गाडी घेऊन येतात. त्यांचा ड्रायव्हर, त्यांचं पेट्रोल. हॉटेलमध्ये राहतात. हॉटेलचे बिल स्वत:च्या खिशातून भरतात. रयत शिक्षण संस्थेला एक पैशाचे बिलही त्यांनी दिले नाही. या संस्थेला स्वत:चे मानून रामशेठ येथे काम करतात. राजकारणात ‘घेणारे’ खूप असतात. पण ‘देणारे’ एकटे रामशेठच आहेत.

■ ■ ■

# फ्लॅशबॅक

***रामशेठ ठाकूर यांच्या नेतृत्वाकडे पक्ष भूमिकेतून महाराष्ट्राच्या कोणत्याही नेत्याने कधीही पाहिले नाही. रामशेठ ठाकूर हे जनसामान्यांचे नेते आहेत, असे प्रत्येक नेत्याला वाटायचे आणि वाटत आहे. त्याच भावनेतून श्री. विलासराव देशमुख असतील, शेकापचे नेते प्रा. एन.डी. पाटील असतील किंवा काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बॅ. अंतुले, पतंगराव कदम असतील.. या सर्वांनी रामशेठ ठाकूर यांच्यामधील सामाजिक कार्यकर्ता किती मोठा आहे, हे नेमके हेरले होते आणि त्याच भावनेतून या सर्व नेत्यांनी रामशेठ यांच्या व्यक्तिमत्वाचे नेमके विश्लेषण केलेले आहे. रामशेठ हे अमृतोत्सवाकडे निघाले असताना या सर्व जुन्या नेत्यांची आठवण येते आणि त्यांनी व्यक्त केलेली मते फ्लॅशबॅकसारखी डोळ्यासमोरून जातात. या पानावर अशाच महत्त्वाच्या व्यक्तिमत्वांनी त्या त्यावेळी व्यक्त केलेली ही साठवण...***






महाराष्ट्राच्या पुरोगामी राजकारणातले प्राध्यापक एन. डी. पाटील यांनी **‘माझी संघर्ष यात्रा’** हे आत्मकथन लिहले असून विजिगिषा प्रकाशन संस्थेने ते पुस्तक नुकतेच प्रसिद्ध केले आहे. त्या पुस्तकात पान ५५वर ‘रयत शिक्षण संस्थेचा वटवृक्ष’ या लेखात एन.डी. पाटील यांनी श्री. रामशेठ ठाकूर यांच्याबद्दल जे लिहिले आहे ते ‘माझी संघर्ष यात्रा’ पुस्तकातून साभार.

# गरिबांचे आधारकार्ड रामशेठ
## –प्रा. एन.डी. पाटील

सामाजिक क्षेत्रात मी आणि रामशेठ ठाकूर अशा दोघांनी खूप वर्षे एकत्र काम केले. रयत शिक्षण संस्था आणि शेतकरी कामगार पक्ष या दोन्ही ठिकाणी रामशेठ ठाकूर हे माझे सहकारी होते. अत्यंत उमद्या मनाचा दिलदार आणि दानशूर असलेला हा माझा सहकारी लोकसभेवरही निवडून गेला. शिक्षण, सहकार, उद्योग, शेती अशा विविध क्षेत्रात रामशेठने प्रभावी काम केले. अलिकडच्या काळात राजकीय क्षेत्रातील मंडळी फायदा–तोट्याचा विचार करून लोकांना मदत करीत असतात. रामशेठ ठाकूर हे त्याला अपवाद आहेत. दानशूरपणाचा मानदंड म्हणून त्यांच्याकडे पाहावं असे ते व्यक्तिमत्व आहे. सामाजिक काम, शैक्षणिक काम किंवा कोणाची व्यक्तिगत अडचण.. त्या प्रत्येक संस्थेला किंवा व्यक्तिला रामशेठ ठाकूर हे आधारकार्ड असल्यासारखेच वाटतात.

नंतरच्या काळात आमच्या राजकीय वाटा वेगळ्या झाल्या असल्या तरी आमच्यातला जिव्हाळा तसूभरही कमी झाला नाही, असे त्यांच्याशी माझे अनेक वर्षांचे संबंध राहिले आहेत. ’’

■ ■ ■

# हे रामशेठ नव्हे... हे दानशेठ –विलासराव



रामशेठ हा राजकारणी माणूस नाही. हा निर्मळ मनाचा माणूस आहे. मी त्यांना जवळून पाहिलेय... लांबूनही पाहतो आहे.. मी नेहमी म्हणतो की, प्रत्येक जिल्ह्यात एक रामशेठ असेल तर सामाजिक क्षेत्र असोत, शिक्षण क्षेत्र असो, तो जिल्हा मागे राहणार नाही. राजकारणात राहून ते राजकारणाच्या बाहेर आहेत. एकदा मला त्यांनी पनवेलला बोलवले... मला वाटले राजकीय सभा असेल..., पण कबड्डी स्पर्धांचे आयोजन होते. शेवटचा सामना पंजाब विरुद्ध भारतीय रेल्वे असा होता.. तो सामना पहात असताना अंगावर रोमांच आले... मी रामशेठ यांच्याकडे बघत होतो... हा माणूस राजकारणी नाही... किती विषयांत त्यांना रूची आहे, हे मी पाहात होतो. दुसऱ्यावेळी त्यांनी मला पुन्हा बोलावले ते मल्हार महोत्सवाला... केवढे प्रचंड व्यासपीठ आणि प्रचंड कार्यक्रम.. तो सांस्कृतिक... राजकारणाचा स्पर्श कुठेही नाही. माझ्या मनावर तो कार्यक्रम ठसला.



तिसऱ्यांदा मी पनवेलला गेलो ते प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाला. मला वाटले घरगुती कार्यक्रम असेल... पण तिथे गेलो तर स्वातंत्र्य सैनिकांच्या सत्काराचे आयोजन... त्या कार्यक्रमात प्रशांतला वाढदिवसाची काय भेट द्यावी, असा विचार मनात होता... माझे मित्राशी बोलणे झाले... त्यांनी सुचवले आणि मी लगेच जाहीर करून टाकले. पनवेल एस. टी. स्टँडसमोर उड्डाणपुलाची गरज आहे. अपघात फार होतात... उड्डाणपूल देवून टाकला.

नंतर रामशेठ पुन्हा एकदा माझ्याकडे आले... आणि म्हणाले, ‘पनवेलला चला...’ मी गेलो... त्यांच्या स्पोर्टस कॉम्पलेक्सचे भूमिपूजन होते. हा तपशील मी याकरिता सांगतोय की, हा माणूस राजकारणी अजिबात नाही. सगळ्या अर्थाने ते सामाजिक नेते आहेत. त्यांचे क्रिडा संकुल पुढे उभे राहिले असेल... पुढे मला कळले की ते भजन स्पर्धा घेतात... मराठी दिवाळी अंकांना २५ – २५ हजारांची बक्षिसे देतात... त्यांना रामशेठ म्हणण्याऐवजी ‘दानशेठ’ म्हणायले हवे. रामशेठ कोणत्याही पक्षात असोत... त्यांची मैत्री निखळ आहे... रामशेठ सारख्या माणसांमुळेच महाराष्ट्रातील राजकीय वातावरण निरोगी राहिले. माझ्या या मताला सर्वांचा पाठींबा असेल...

*(२ जून २०१२ रोजी रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवशी लिहिलेल्या लेखात माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी व्यक्त केलेल्या भावना... दुर्दैवाने त्याच वर्षी १४ ऑगस्ट २०१२ रोजी विलासरावांचे निधन झाले.)*

■ ■ ■

# जिथे शेतकऱ्यांची लढाई... तिथे रामशेठ –दि.बा. पाटील



जिथे–जिथे शेतकऱ्यांची लढाई आहे, तिथे–तिथे रामशेठ यांना पाहिले आहे. शेतकऱ्यांवर अन्याय होईल त्या प्रत्येक लढ्यात ते शेतकऱ्यांच्या बाजूने ठामपणे उभे राहतात हे मला पक्के माहिती आहे. शेतकऱ्यांच्या आर्थिक हिताच्या प्रश्नासाठी रामशेठ हे पक्षाची बंधने आडवी येऊ देत नाहीत. अंतिम लढ्यासाठी तयार असतात हे मी स्वत: पाहिले आहे. २३ मार्च हा शहीद दिन म्हणून आम्ही पाळतो. त्या दिवशी क्रांतीसिंह भगतसिंह यांना फाशी दिली गेली. रायगडमधील शेतकऱ्यांच्या जीवन–मरणाचा लढा आम्ही त्याच दिवशी सुरू केला. रांजणपाडा येथे संघर्ष मेळाव्याला माझ्या दोन पाऊले पुढे रामशेठ उभे होते. त्यावेळी त्यांच्या पक्षाचे सरकार होते, पण शेतकऱ्यांच्या लढाईत ते आमच्यासोबत होते. सिडकोच्या विरोधातही शेतकऱ्यांची घरे नियमित करण्यासाठी झालेल्या लढ्यात ते माझ्यासोबत कायम होते. सिडकोच्या लढ्यातही रामशेठ ठाकूर माझ्यासोबत कायम राहले. आमदार प्रशांत ठाकूरही आमच्या लढाईत सोबत होते. जेएनपीटीने शेतकऱ्यांच्या मागण्या पूर्ण केल्या नाहीत म्हणून आम्ही आरपार लढाई जाहीर केली. त्यात रामशेठ ठाकूर हे आघाडीवर राहिले. शेतकऱ्यांसाठी रस्त्यावर उतरणाऱ्या नेत्यांमध्ये रामशेठ आजही अग्रभागी आहेत, याचा आम्हाला अभिमान आहे.

*(स्व. दि. बा. पाटील यांच्या रांजणपाडा येथील भाषणातून...)*

■ ■ ■

# रामशेठ हे सर्वांचे आधार –बॅ.ए.आर. अंतुले

रामशेठ यांची शिक्षणक्षेत्रातील कामगिरी कौतुकास्पद आहे. त्यांनी सुरू केलेल्या लॉ कॉलेजच्या उद्घाटनाला मी गेलो होतो. त्यांच्या सर्व शिक्षण संस्थांमध्ये गरीब विद्यार्थ्यांना सहज प्रवेश मिळतो हे मी पाहिले आहे. पनवेल आणि उरण भागात रामशेठ यांनी उभी केलेली कामे मी पाहिलेली आहेत. समाजकारण करताना रामशेठ त्या कामाची राजकारणाशी सांगड घालत नाहीत. प्रसंगी राजकारण बाजूला ठेवतील. समाजकारणाला महत्त्व देतील. त्यामुळेच सर्व पक्षांचे लोक रामशेठ यांचा आदर करतात.. आणि रामशेठ यांच्याबद्दल त्यांना प्रेम वाटत असते.






एका लोकसभा निवडणुकीत त्यांनी माझाही पराभव केला, पण त्या पराभवानंतर त्यांच्या मनाच्या दिलदारीचा मला लगेच प्रत्यय आला. त्यांचा विजय साजरा करताना माझ्याबद्दल अत्यंत आदराच्या भावना व्यक्त केल्या होत्या, हे मला समजले. त्यामुळे ही व्यक्ती केवळ राजकारणी नसून सर्वधर्मसमभाव जपणारी आहे. राजकारणात जय–पराजय होत असतात. विजयाने रामशेठ कधी हुरळून गेलेले पाहिलेले नाहीत आणि एका पराभवाने मीही कधी खचून गेलो नाही. शिवाय जय–पराजय त्या–त्या दिवसाचे असतात. राजकीय जीवनातील मैत्री कायम टिकवायची असते. रामशेठ यांनी ही मैत्री कायमची टिकवली, याचा मला आनंद आहे.

*(२ जून २०१३ रामशेठ यांच्या वाढदिवशी बॅ. अंतुले यांनी लेखात व्यक्त केलेल्या भावना.)*

■ ■ ■


Developed By
MAHAAVIR
MAHAAVIR LABDHI
BEAUTIFUL SEA FACING 2 & 3 BHK APARTMENT'S
At URAN, Near Atal Setu & Navi Mumbai Airport
02 जून
Happy Birthday,
Shree. Ramshethji Thakur
(Ex-MP)
Best wishes on your Birthday.
Wishing you another year
of great accomplishments!
NEW LAUNCH
Site Add.: Mahaavir Labdhi located at CTS No.420A, 420B, 420C, 420D and 403, Village Mhatavli, Taluka Uran, Dist. Raigad
Call: 98673 11345 / 022-41572600
MahaRERA Registration No.: P52000045246 & is available on the website https://maharera.mahaonline.gov.in | *T&C APPLY
Corporate Add.: Mahaavir Buildcon LLP, 302-306, Persipolis, Plot - 74, Sector - 17, Vashi, Navi Mumbai 400 703 | www.mahaavir.com


अगणित माणसे या जगात जन्मास येतात,
पण तुमच्यासारखे यशस्वी व्यक्तिमत्त्व
एखादंच जन्मास येतं...
माजी खासदार, लोकनेते
02 जून
मा. श्री. रामशेठ ठाकूर
यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा !
विशाल ठाकूर
राकेश म्हात्रे
राहूल म्हात्रे
शुभेच्छुक
इंडियनऑयल
IndianOil
श्री स्वामी समर्थ फ्युएल स्टेशन
इंडीयन ऑईलचे अधिकृत विक्रते
मुंबई गोवा हायवे, NH-66, हॉटेल सागर पॅलेस शेजारी, मु. पो. जिते, ता. पेण, जि. रायगड. ४०२१०७
E mail - shreeswamisamarth0205@gmail.com


02 June
WISHING YOU MANY MORE YEARS
IN YOUR MISSION TO CHANGE LIVES.
HAPPY BIRTHDAY
SHRI. RAMSHETH THAKURJI
(Ex. MP)
With best compliments from
gandhar
oil refinery india ltd.
divyol
solutions within solutions
Corporate Office
18th Floor, DLH Park, S. V. Road, Goregaon (w), Mumbai 400062.
Tel : + 91-22-4063 5600. Fax : 91-22-4063 5601
Email : sales@gandharoil.com. website : www.gandharoil.com
Government Recognised Star Export House


माजी खासदार लोकनेते
मा. श्री. रामशेठ ठाकूर
आपणांस वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा !
PRACHIN Healthcare
शुभेच्छुक
प्राचिन हेल्थकेअर
(मल्टीस्पेशालीटी हॉस्पिटल)
इमर्जन्सी मॅनेजमेन्ट एक्सपिरियन्स डॉक्टरांची टीम
* ३ स्टेट स्पेशल मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
* ॲडव्हान्स डायग्नोस्टिक मशिनरी ॲण्ड इक्विपमेन्ट
* २४X७ तास पॅथॉलॉजी
* २४X७ कार्डियक ॲम्बुलन्स
* २४X७ ॲक्सिडेन्ट ॲण्ड ट्रॉमा केअर सेंटर
* पुर्णपणे सुसज्जित इंटेसिव केअर युनिट
* २४X७ फार्मसी
* ॲडवान्स टेलीमेडिसन सिस्टम
संचालक
डॉ. मंगेश रा. डाके
(एम. एस. डि. ओर्थो)
डॉ. संगिता मं. डाके
(एम. डि. डि. जी. ओ.)
पत्ता : प्लॉट नंबर ६९/२. स्वामी नित्यानंद रोड, गार्डन हॉटेलच्या मागे, एच.ओ. सी. कॉलनी, पनवेल नवी मुंबई, महाराष्ट्र ४१०२०६
वेबसाईट : prachinhealthcare.com
ईमेल : info@prachealthcare.com
फोन नं. : ०२२७१३३३२५८/५९

# रामशेठ... आधारस्तंभ... दीपस्तंभ... –नितीन गडकरी





बालपणापासून अपार कष्ट केलेल्यांच्या काहीजणांच्या वाट्याला अक्रस्ताळेपणा किंवा आक्रमकता येते. श्री. रामशेठ ठाकूर यांच्या व्यक्तिमत्वात प्रसन्नता, शांतता आणि ऋजुता आहे. पद असो वा नसो... ते सातत्याने शेतकऱ्यांच्या बाजूने उभे राहिले आहेत. रयत शिक्षण संस्थेत 'कमवा आणि शिका' या योजनेत शिकल्यामुळे शैक्षणक क्षेत्राबद्दल त्यांना आस्था आहे. त्यामुळेच त्यांनी शिक्षणक्षेत्रात मोठे जाळे उभे केले. ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण हेच त्यांचे सूत्र आहे.

कोरोनाच्या काळात रामशेठ यांनी केलेले काम मला समजले. या संकटकाळात गरजूंना त्यांनी एवढी मदत केली की, एखाद्या आधार स्तंभासारखी आणि दीपस्तंभासारखी ती उपयोगी पडली. एक थोर लोकसेवक आणि लोकदाता समाजाशी समरस होऊन लोकांच्या दु:खात सहभागी होतो. पनवेलचा महापूर असो किंवा कोरोना काळ असो... रामशेठ यांचे दोन्ही सुपूत्र प्रशांत आणि परेश हे घरात बसले नाहीत. १५ वर्षांपूर्वीच्या महापुराच्या वेळी त्यांनी केलेले कार्य मला माहिती आहे. त्यावेळी ते खासदारही नव्हते आणि प्रशांत आमदारही नव्हता. पदासाठी रामशेठ यांनी काही केलेले नाही. कोरोनाच्या काळात जवळपास ३ कोटी रुपये खर्च करून विविध स्वरूपाची मदत शिस्तबद्धरितीने रामशेठ यांनी पुरवली. याची मला संपूर्ण माहिती आहे. अशा या रामशेठ यांना ईश्वराने उदंड आयुष्य आणि आरोग्य द्यावे, अशी मी प्रार्थना करतो.

■ ■ ■

# रामशेठ यांच्या नावातच 'राम'... मग काय कमी... –देवेंद्र फडणवीस





संकटाच्या काळात जी व्यक्ती धावून येते... तिच्याबद्दल लोकभावना कायम निर्मळ असतात... कारण त्या व्यक्तीचे सामाजिक आणि कौटुंबिक नाते घराघरात तयार होते. माजी खासदार रामशेठ ठाकूर यांच्याशी सर्वांचे असे नाते निर्माण झाले आहे. म्हणूनच ते लोकनेते झाले. पक्षविरहीत काम करणे हे त्यांचे ब्रीद असल्याने त्यांना काम करण्याची अलौकिक ऊर्जा मिळालेली आहे. त्यांची ऊर्जा एवढी आहे की, त्यांना वयाचा विसर पडतो. काही व्यक्तिमत्त्वाची ऊर्जा अशी असते... ज्यामुळे कित्येकांची आयुष्य उजळून निघतात. रामशेठ ठाकूर यांच्या व्यक्तिमत्त्वात हा विलक्षण गुण आहे. ज्यामुळे जीव ओतून काम करणारी पिढी ते घडवू शकले. कार्यकर्त्यांची मोठी आणि मजबूत फळी त्यांनी निर्माण केली. राजकारण असो किंवा समाजकारण... या दोन्ही क्षेत्रात खंबीर आणि जीवलग कार्यकर्ते असावे लागतात. रामशेठ ठाकूरजींनी विश्वासाने ते तयार केले आहेत.

दोन वेळा संसदेत प्रतिनिधीत्त्व केलेल्या रामशेठ ठाकूर यांनी कितीतरी प्रश्नांचे पालकत्त्व घेतले आहे. कितीतरी शिक्षण संस्था आणि त्यातील विद्यार्थी त्यांनी जीवनात उभे केले. आयुष्याची ४० वर्षे त्यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी संघर्ष केला. अतिशय हलाखीच्या स्थितीत आयुष्य घालवलेली व्यक्ती समाजासाठी आधार म्हणून उभी राहू शकते.

कोरोनाच्या संकटातही जनतेच्या पाठीशी ते खंबीरपणे उभे राहिले. लॉकडाऊन काळात हातावर पोट असलेल्या अनेकांची उपजीविका अडचणीत होती. रामशेठ तेव्हा त्यांच्यासाठी धावून गेले. त्यावेळचे महाराष्ट्राचे राज्यपाल भगतसिंह कोशारी यांनी कोरोना देवदूत पुरस्काराने सन्मान केला. काही व्यक्तिमत्त्वे जनतेच्या मनात घर करून असतात... रामशेठ ठाकूर हे त्याच भूमिकेतील आहेत. खरंतर त्यांच्या नावातच राम आहे. रामशेठ यांना मी दीर्घ, निरामय आणि सुंदर आयुष्य लाभावे अशा शुभेच्छा देतो..!


(७०व्या वाढदिवशी विरोधी पक्षनेते असताना श्री. देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या शुभेच्छा.)

■ ■ ■

## रामशेठ ठाकूर यांच्यामुळे आदिवासी मोखाडा गावात उभे राहिले भव्य महाविद्यालय








## रयत शिक्षण संस्थेची उलवे येथील जुनी शाळा नव्याने बांधून देण्याची जबाबदारी रामशेठ ठाकूर यांच्यावर सोपविण्यात आली आणि त्यांनी इमारत बांधून दिली...





## ५ ऑगस्ट २००५... विलासराव देशमुख आले, रामशेठ यांनी मागणी केली 'आम्हाला उड्डाणपूल द्या' आणि १८५ कोटी रुपयांचा उड्डाणपूल पनवेलला मिळाला!




अगणित माणसे या जगात
जन्मास येतात,
पण तुमच्यासारखे यशस्वी
व्यक्तिमत्त्व एखादंच जन्मास येतं...
माजी खासदार, लोकनेते
आदरणीय
रामशेठ ठाकूर
आपणांस
वाढदिवसाच्या
अनंत शुभेच्छा!
सौ. कुंदा कृष्णा पाटील
मा. पंचायत समिती सदस्या
कृष्णा पाटील
मा. सरपंच
भाजपा अध्यक्ष, प्रभाग क्र. २
पनवेल महानगरपालिका
शुभेच्छुक
श्री. कृष्णाशेठ पाटील सामजिक विकास मंडळ, पडघे
मु. पो. पडघे,
ता. पनवेल, जि. रायगड
कुणाल कृष्णा पाटील
(युवा नेते)


तुमचे नेतृत्व
संघर्षाचे, स्थानिकांचे,
प्रकल्पग्रस्तांचे
आणि जनहिताचे...
02 जून
माजी खासदार, लोकनेते
मा.श्री.
रामशेठ ठाकूर
साहेब, आपणांस
वाढदिवसाच्या
मनःपूर्वक शुभेच्छा!
शुभेच्छुक
श्री. मदन तुकाराम कोळी
मा. उपनगराध्यक्ष, प.न.पा.


02 जून
रायगड जिल्ह्यातील
दानशूर व्यक्तिमत्व...
माजी खासदार
लोकनेते
मा.श्री.
रामशेठ ठाकूर
साहेब, आपणांस
वाढदिवसाच्या
मनःपूर्वक शुभेच्छा!
शुभेच्छुक
कृपाशंकर तिवारी


लोकनेते मा. श्री. रामशेठ ठाकूर यांना
पितांबरीतर्फे वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!
पितांबरी
होमकेअर डिव्हिजन
उत्पादने पितांबरीची
म्हणजे
परिपूर्ण स्वच्छता
घराची!
Pitambari
Klenz
POWERWASH
Pitambari Products Pvt. Ltd.: Thane: 8451907105,
Mumbai: 8291853804, Raigad: 8652182530,
CRM: 022 - 6703 5564 / 5699, Toll Free: 18001031299.
Visit: www.pitambari.com | CIN: U52291MH1989PTC051314.
Scan To Shop

# ‘रामशेठ म्हणजे दातृत्वाचा अखंड वाहणारा झरा’



**शरद पवार यांच्या विशेष लेखातून...**




‘आजच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. अनिल पाटील, ज्यांच्या दातृत्वातून आज हा सोहळा आपण आयोजित करत आहोत, ते रयत शिक्षण संस्थेचे माजी विद्यार्थी, खऱ्या अर्थाने हितचिंतक... आमचे सहकारी रामशेठ ठाकूर, सौभाग्यवती ठाकूर यांचे चिरंजीव आमदार प्रशांत ठाकूर, त्यांचे सगळे सहकारी, संसदेतील खासदार श्रीनिवास पाटील, संस्थेचे व्हाईस चेअरमन ॲड. भगिरथ शिंदे, व्यासपीठावरील सर्व मान्यवर आणि सहकारी बंधू-भगिनींनो...

आजचा कार्यक्रम, तसे म्हटले तर, रयतेच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. आजच्या कार्यक्रमाचे निमित्त आहे ते, रामशेठ ठाकूर! त्यांच्यासोबत एखाद्या प्रकल्पाची चर्चा केली की, त्या चर्चेतून किती खर्च येईल, असे सांगितले, की रामशेठ पटकन सांगतात, ‘काही काळजी करू नका...’ त्यांच्या उत्तरानंतर असे वाटते की, ‘आपण उगीचच कमी रक्कम सांगितली की काय?’(हशा)... गंमतीचा भाग सोडून द्या.., पण रामशेठ यांच्या मुखातून कधी नकार येत नसतो. आणि विशेषत: ‘रयते’चे काम म्हटल्यानंतर आजपर्यंत नकार नावाची भूमिका त्यांनी कधीच मांडलेली नाही. गेल्या अनेक वर्षांपासून संस्थेचा आणि रामशेठ यांचा संबंध आहे. तसा आम्हा सर्व लोकांचा आणि त्यांचाही संबंध आहे. समाजिक जीवनात अनेक ठिकाणी आम्ही एकत्र असतो.

१९७८मध्ये राज्याचे सरकार चालवायची जबाबदारी जेव्हा माझ्यावर आली तेव्हा माझ्या पाठीमागे भक्कमपणे उभे राहण्याची कामगिरी करणारे जे लोक होते, त्यामध्ये एक रामशेठ ठाकूर होते. रामशेठ हे कमी बोलणारे... आणि अधिक काम करणारे... अशा प्रकारचे व्यक्तिमत्त्व आहे. रायगड जिल्हा एकेकाळी फार पुरागामी शक्ती देणारा जिल्हा म्हणून ओळखला जाई... या जिल्ह्यात भाऊसाहेब राऊत नावाचे एक व्यक्तिमत्त्व होते. शेतकरी कामगार पक्षाचे ते वरिष्ठ नेते होते. अखंड भारतभर त्यांची सेवा आणि सामान्य माणसांच्या हितासाठी या भाऊसाहेबांनी काम केले.



त्या भाऊसाहेबांचा आदर्श घेऊन त्या जिल्ह्यामध्ये अनेक कर्तृत्ववान लोक पुढे आले. त्या कर्तृत्त्वानांच्या मालिकेमध्ये दि.बा. पाटील यांचे नाव घ्यावे लागेल. अनेक सहकाऱ्यांची नावे घेता येतील, पण त्या सगळ्या नावांच्या पुस्तकात जोपर्यंत ‘रामशेठ’ यांचे नाव येत नाही तोपर्यंत ते पुस्तक पूर्ण होत नाही. त्या विचारातूनच वाढलेले हे गृहस्थ आहेत. ते कोणत्या पक्षात आहेत... हे महत्त्वाचे नाही, पण त्यांची बांधिलकी सामान्य माणसांशीच आहे. आणि हि बांधिलकी ‘रयते’शी ठेवताना त्यांनी कधी कमतरता दाखवली नाही आणि कधी तडजोडही केली नाही. त्यामुळे सातारामधील हा मोठा प्रकल्प घेण्यासाठी त्यांनी फार मोठा हातभार लावला. काही नवे करतोय, असे आम्ही म्हटल्यावर रामशेठ यांचा हातभार असतोच... डॉ. अनिल पाटील यांनी त्यांच्या भाषणात संस्थेच्या अनेक नवीन योजना सांगितल्या. मी अनिल पाटील यांना एवढेच सांगतो की, तुम्ही जे काम हातामध्ये घ्याल, त्यामध्ये अतिशय उत्तम आणि तज्ज्ञ लोक महाराष्ट्रात आहेत. त्यांची आणि तुमची मी गाठ घालून देतो आणि त्यानंतर नवे विभाग सुरू करण्यासाठी जे काही करावे लोगल ते रामशेठ आणि मी बघून घेऊ.. एवढी मला रामशेठ यांच्याबद्दल खात्री आहे.

रामशेठ यांच्याबद्दल मुद्दाम सांगितले पाहिजे की, एखादे व्यक्तिमत्त्व घडायचे असेल तर ते व्यक्तिमत्त्व कसे असले पाहिजे? त्या व्यक्तिमत्त्वाची **निष्ठा माता, माती आणि मातृभूमी** या तीन गोष्टींसाठी पूर्णपणे बांधिलकी असलेली समाजातील जी थोडी माणसे आहेत ती राष्ट्रीय गरज पूर्ण करणाऱ्यांमध्ये रामशेठ ठाकूर एक आहेत.

या ठिकाणी अनेकांची भाषणे झाली... त्यात अनेकांनी रामशेठ यांच्याबद्दल अनेक गोष्टी सांगितल्या. मी ही भाषणे ऐकताना मगापासून हिशेब करतो आहे की, माझे गणित जरा कच्चेच आहे... मी गणितात फारसा ठीक नव्हतो... म्हणून कॉमर्स कॉलेजमध्ये पुण्याला मी गणित विषय घेतलाच नव्हता... त्याऐवजी मी दुसरा विषय घेतला... गणिताच्या भानगडीत मी पडलो नाही.., पण रावसाहेब शिंदे भेटल्यानंतर गणित जरा पुन्हा पाहतो आहे. आम्ही आता यादी करत होतो... की रामशेठ यांनी आतापर्यंत काय काय दिले.... सगळा तपशील मला माहिती नाही... रावसाहेब शिंदे यांना माहिती असेल, पण मला जी माहिती आहे ती मोखाडा ही आदिवासींची शाळा नव्याने उभी करण्यासाठी रामशेठ यांनी आठ कोटी दिले आहेत. या साताऱ्याच्या छत्रपती शिवाजी महाराज महाविद्यालयाच्या नवीन इमारतीसाठी ७ कोटी दिले... कामोठेतील नवीन संस्थेसाठी १७ कोटी दिले... उलवे येथील संस्थेसाठी १७ कोटी दिले... संगणकीय प्रकल्पाला १ कोटी... त्यानंतर काही संगणक प्रकल्पांना ५ कोटी... आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी १ कोटी... अशी कोट्यवधींची रक्कम त्यांनी आजपर्यंत रयतला दिलेली आहे. आणि त्याशिवाय अण्णा-वहिनी प्रतिष्ठानला २.५ कोटींचा धनादेश त्यांनी दिलेला आहे.

आयुष्यात माणसे कष्टाने पुढे येतात... आदर्श पुढ्यात ठेवतात.. पण कष्टातून धनवान झाल्यानंतर त्या धनाचा उपयोग, ज्या कठीण परिस्थितीतून आपण वाढलो, त्याचप्रमाणे पुढे जाऊ पाहणाऱ्या पिढीसाठी काहीतरी केले पाहिजे, या भूमिकेतून रामशेठ म्हणजे दातृत्त्वाचा अखंड वाहणारा झरा आहे, असे मी मानतो. रयत शिक्षण संस्थेबद्दल त्यांनी कमतरता भासू दिली नाही. एवढेच नव्हे तर मला माहिती आहे, नवी मुंबई असेल, रायगड जिल्हा असेल... त्या भागातील सगळा परिसर असेल... त्या भागातील कुठल्या ना कुठल्या कामासाठी रामशेठ यांची ही मदत नक्की आणि नेहमीच असते. त्याबद्दल कृतज्ञाता व्यक्त करणे ही तुमची-आमची सगळ्यांची जबाबदारी आहे. त्यांनी या कामाला हातभार लावला आहे. आणि संस्थेची जी महत्त्वाची शाखा आहे ती शाखा म्हणजे सातारा सर्वदृष्टीने संपन्न होण्यासाठी मोठी मदत केली आहे. त्याबद्दल मी रामशेठ यांना, त्यांच्या पत्नी शकुंतला वहिनींना आणि आमदार प्रशांत ठाकूर यांना मनापासून धन्यवाद देतो आणि माझे दोन शब्द संपवतो..’

*(२७ डिसेंबर २०२१ : सातारा येथील रयत शिक्षण संस्थेच्या प्रांगणात नव्याने उभ्या राहिलेल्या ‘रामशेठ ठाकूर भवन’ या इमारतीचे उद्घाटन केल्यानंतर श्री. शरद पवारसाहेब यांनी केलेले भाषण)*

*(हेच भाषण ‘रयतच्या विचार मंचावरून’ या नावाने प्रसिद्ध झालेल्या शरद पवार यांच्या निवडक भाषणांच्या पुस्तकात समाविष्ट करण्यात आलेले आहे. त्या पुस्तकाचा कोलाज वरती दिलेला आहे.)*

■ ■ ■

# रामशेठ... जसे भावले तसे...





**मधुकर भावे**

रामशेठ ठाकूर ७५व्या वर्षात पाऊल ठेवत आहेत. हे वर्ष त्यांच्या आयुष्यातील ‘अमृत महोत्सवी’ वर्ष आहे. आयुष्यातील उमेदीची वर्षे अतिशय कष्टात घालवल्यानंतर रामशेठ यांना मागे वळून पहावे लागलेले नाही. ‘रयत शिक्षण संस्थे’मध्ये डोक्यावर घमेली वाहून... ‘कमवा आणि शिका योजनेत’ रामशेठ शिकले. बी.ए., बी.एड झाले. शिक्षकाची नोकरी पत्करली, पण आयुष्यात जिद्दीने उभे राहून काहीतरी करून दाखवायची एक उमेद एवढी जबरदस्त होती की, आज रामशेठ यांच्याकडे पाहताना ‘कुठून... कुठे...’ अशी जी मोजकी माणसे असतील... त्यात रामशेठ हे फार उंचीवर आहेत. त्याचे पहिले कारण म्हणजे त्यांचे साधेपण... इतका मोठा आणि इतका साधा माणूस माझ्या पाहण्यात नाही. मी सुरुवात करतो... आणि त्यांचे पहिल्यांदा अभिनंदन करतो ते मोखाड्यापासून... काय आहे मोखाडा... आपल्या मुंबईजवळील ठाणे जिल्ह्यात २८ किलोमीटरचा कठीण घाट चढून गेल्यानंतर हे एक आदिवासी गाव. स्वातंत्र्याच्या ७६ वर्षांनंतर जसे होते तसेच आहे. कर्मवीर भाऊराव यांनी ५० वर्षांपूर्वी तिथे एक कौलारू शाळा बांधली. ती शाळा जुनी झाली... पडकी झाली... ‘रयत’मध्ये शिकलेल्या रामशेठ यांनी ही शाळा दत्तक घेतली. आणि आज त्या ठिकाणी आणखी एक महाविद्यालय उभे राहिले. मोखाड्याला जाऊन आलो... तिथली अवस्था पाहून आलो... ज्या भागात आजही पायात चपला नसलेल्या आमच्या आदिवासी भगिनी कडक उन्हात घाट चढताना रस्त्याच्या बाजूला बसून करवंदे, कैरी, काकड्या, जांभळे विकून पाच-दहा रुपये दिवसाला मिळवत आहेत... त्यांचीच मुले-मुली रामशेठ यांच्या कर्तृत्वामुळे वातानुकूलित सभागृहात संगणकीय शिक्षण घेत आहेत. विठ्ठलाच्या मंदिरात रांगेत उभा राहणाऱ्या भाविकापेक्षा मोखाड्यातील या संगणकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींची रांग उद्याच्या भारताचे चित्र बदलणारी जिद्द असलेली रांग वाटते आणि याचे प्रायोजक आमचे रामशेठ आहेत. त्यांच्यासोबत सतत दोन वर्षे मोखाड्याला खेपा घालणारे आणि ही इमारत उभी करणारे ॲड. भगिरथ शिंदे यांचेही कष्ट मोठे आहेत. आज गरीब माणसाबद्दल कोणाला काही पडलेले नाही. अशा आजच्या वातावरणात पनवेलसारख्या शहरात अतिशय सुखवस्तू असलेल्या रामशेठ यांनी सकाळी ७ वाजता उठून मोखाडा गाठायचे... दिवसभर तिथे उन्हात थांबायचे... इमारत पूर्ण होईपर्यंत आणि शिक्षणाची व्यवस्था मार्गी लागेपर्यंत सलग तीन वर्षे मोखाड्यात खेपा घालायच्या... आपल्या व्यवसायातील पैसा त्या ठिकाणी खर्च करायचा... आणि आदिवासींच्या मुला-मुलींना शिक्षण द्यायचे.... या सगळ्या कर्तृत्वाचे आणि दातृत्वाचे कोणत्या शब्दांत वर्णन करता येईल... बरं... याची कुठेही प्रसिद्धी नाही... पत्रकार परिषद नाही... कॅमेरावाल्यांचा ताफा घेऊन कुठे मुलाखती नाहीत... यात ‘मी केले’ असा अविर्भाव कुठेही नाही. इतक्या सहजपणे... साधेपणे... त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद मी त्या दिवशी पाहिला. स्वत: शरद पवारसाहेब मोखाडा येथे इमारतीचे उद्घाटन करायला आले. दुपारच्या रणरणत्या उन्हात उद्घाटन झाले, पण त्या दिवशी रामशेठ यांच्या मनात आणि जीवनात चांदणे पडल्याचा भास होत होता. जीवनातील कृतार्थता यालाच म्हणतात.

त्या दिवशी त्यांनी एक गंमत सांगितली... एकदा मोखाड्याहून येताना त्यांची नवी गाडी बंद पडली. घाट उतरायचा होता. त्या रस्त्याला वाहन मिळणे फार अवघड... त्यांच्याबरोरचे सहकारी ‘एखादे वाहन येतेय का’ ते पाहात होते. आणि इकडे पाहतात तर काय... रामशेठ पायीच घाट उतरू लागले. नशीबाने एक ट्रक आला. त्या ट्रकला थांबवले... त्या ट्रकवाल्याने रामशेठ यांना ट्रकच्या केबिनमध्ये बसवले... रामशेठ यांनी कसलीही ओळख न देता ते ट्रकमध्ये बसले आणि ठाण्याच्या वेशीपर्यंत आले. तिथे दुसरी गाडी मागवून घेतली... एखाद्या नेत्याने दिवसभर याचा व्हिडीओ चॅनलवर चालवला असता... रामशेठ समजून घ्यायचे असतील तर त्यांच्या मनाचा नितळपणा... साधेपणा... हा मला कोणत्याही शब्दात तोलता येणार नाही, इतका मोठा वाटतो.

रोज सकाळी ७ वाजता शेकडो लोक त्यांच्य घरी त्यांच्या भेटीला हजर असतात.. रामशेठ आमदार नाहीत... खासदार नाहीत... मंत्री नाहीत... मग ही गर्दी का? कारण ते खऱ्या अर्थाने लोकनेते आहेत. मी जन्माला आलो तेव्हा घेऊन काय आलो होतो... आणि घेऊन काय जाणार आहे.... इतक्या नितळ मनाने आलेल्या गरीब माणसाला ऐकून घेणे आणि शक्य असेल ती मदत करणे त्यामुळे दिवसातील २४ तासांपैकी १५-१६ तास त्यांनी लोकांना दिले. रामशेठ मला एकटे कधीच दिसले नाहीत. रामशेठ चिडलेले दिसले नाहीत... रामशेठ यांच्या तोंडून कोणाकरिता अपशब्द बाहेर पडलेला ऐकला नाही... गर्दी म्हणजे रामशेठ... ‘रयत’च्या बैठकीला जातानासुद्धा पाच-दहा लोक ते बरोबर घेणार... परदेशात जायचे म्हटले तरी एक ताफा त्यांच्याबरोबर असतोच... परदेशात जाताना ‘ट्रीप’ म्हणून ते जात नाहीत. तिथे जे काही चांगले आहे ते आपल्या संस्थेत कसे आणता येईल... बदल कसा करता येईल... जे जे चांगले ते ते त्यांनी उचलले... आपल्या संस्थेत आणले... आधुनिक जगाच्या बरोबर आपली शिक्षण संस्था रहावी, त्याची कटाक्षाने त्यांनी काळजी घेतली. जग बदलले तरी रामशेठ मात्र बदलले नाहीत. ते जसे साधे होते तसेच आहेत. त्यांचा ‘हाफ शर्ट’चा ‘फूल शर्ट’ कधी झाला नाही... त्यांच्या पायातील चप्पल होती तिथे बूट आला नाही...

रामशेठ यांची मला कमाल अशी वाटते की, त्यांचे उपजत ज्ञाान अभिजात ज्ञाानापेक्षाही कितीतरी उच्च दर्जाचे आहे. ते बी.ए. आहेत म्हणजे शिकलेले आहेत. बी.एड. आहेत म्हणजे त्यांना शिकवता येते.., पण एखादे क्रीडा संकुल उभे करायची... नगररचनाकाराची स्थापत्य दृष्टी त्यांनी कुठे शिकली? त्यांनी उभे केलेले क्रीडा संकुल हे कोणत्या आर्किटेकचे नाही. ती सगळी संकल्पना, आराखडा त्यांचाच आहे. रामशेठ पत्रकार नाहीत.., पण २००८ साली त्यांनी ‘रामप्रहर’ नावाचे दैनिक सुरू केले आणि आज गेली १८ वर्षे अखंडपणे दैनिक चालवतात... आणि ते दैनिक चालवताना त्यांच्यातील जागरूक पत्रकारही अनेकवेळा जाणवला...

आणखी एका गोष्टीची कमाल वाटते... राजकारणात सत्तेचा लोभ अनेकांना सुटत नाही. रामशेठ यांनी दोनदा खासदार झाल्यानंतर जाहीर करून टाकले की, ‘आता मी निवडणूक लढवणार नाही...’ अशा घोषणा अनेक नेते करतात.. ‘ही माझी शेवटची निवडणूक’ अनेक निवडणुकीत असे सांगून त्यानंतर चार निवडणुका लढलेल्यांची नावे मला माहिती आहेत. रामशेठ यांनी एकदा निर्णय जाहीर केल्यानंतर स्वत:ला पद मिळवण्यासाठी कधीही पुढे पुढे करताना दिसलेले नाहीत आणि त्यांनी पदही घेतलेले नाही. राजकारणात पूर्णवेळ होते तेव्हासुद्धा त्यांचे राजकारण हे २० टक्केच होते. ८० टक्के समाजकारणच करत होते. आज आता जवळपास ते १०० टक्के समाजिक कामच करत आहेत. राजकीय कामांचा सगळा वसा त्यांनी आता प्रशांत आणि परेश या सुपुत्रांकडे सोपवलेला आहे.

रामशेठ यांच्याबद्दल आणखी एक कौतुकाची गोष्ट आहे... ते जेव्हा शे.का. पक्षात होते त्यावेळी त्यांनी इमानेइतबारे पक्षासोबत राहून निवडणूक लढवली अणि लोकसभेत खासदार म्हणून निवडून आले. शे.का.पक्षाचे दिग्गज नेते दत्ता पाटील आणि दि.बा. पाटील यांना लोकसभेत निवडून जाता आले नव्हते, पण शे.का.पक्षाचे उमेदवार झाल्यानंतर रामशेठ हे एकदा नव्हे दोनदा खासदार म्हणून निवडून गेले. त्यात एकदा दि.बा. पाटील यांना पराभूत केले... एकदा बॅ. अंतुलेसाहेबांना पराभूत केले.., पण ज्यांना पराभूत केले त्यांच्याबद्दलचा नितांत आदर त्यावेळीही होता आणि आजही आहे. ‘दिबां’चे नाव नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला द्यावे म्हणून एक लाखांचा मोर्चा काढण्याचे नेतृत्त्व करणारे रामशेठ ठाकूर हेच होते.

असे हे रामशेठ शब्दात मावणारे नाहीत. पुस्तकातही मावणारे नाहीत. त्यांचा आवाका मोठा आहे... आणि सामाजिक कामात त्यांना जी आत्मियता आहे त्याला तोड नाही. शिक्षण क्षेत्रात त्यांनी ज्या संस्था उभ्या केल्यात त्या संस्थांना आज मुंबई विद्यापीठाने सर्वोत्तम संस्थांची प्रमाणपत्रे दिली आहेत. प्रत्येक इमारत देखणी आहे. जे करायचे ते उत्तम करायचे... अद्ययावत करायचे आणि हुरळून न जाता शांतपणे करायचे... अशा समविचारी वृत्तीने रामशेठ यांनी त्यांच्या जीवनात खूप मोठे काम उभे केले आणि आणि एवढे काम उभे केल्यावर त्यांच्यातील साधेपण जसे आणि तसेच कायम आहे. अलिकडच्या स्पर्धेच्या काळात इतक्या शांत वृत्तीचा, सत्तेसाठी न हपापलेला असा नेता सापडणे अवघड...


रामशेठ यांनी ७५ वर्षात पाऊल ठेवले आहे. पुढच्या वर्षी ते ७५ पूर्ण करतील आणि शताब्दीकडे त्यांची वाटचाल होईल... रामशेठ यांचा ‘हात’ देणारा आहे. देणाऱ्याने देत जावे... आणि हे देत असताना आपण ज्या परिस्थितीतून मोठे झालो, त्याचा क्षणभरही त्यांना विसर पडत नाही म्हणूनच मदत करताना ते कधी अखडले नाहीत.




काही वर्षांपूर्वी उलवा भागात त्यांचे जे जुने घर आहे ते जुने घर पहायला गेलो... त्या घरात पाऊलवाटेने जाताना एका खुर्चीत एक मावशी बसली होती.... रामशेठ यांनी त्या मावशीला पाहून नमस्कार केला. आणि खिशात हात घालून जेवढ्या नोटा हातात आल्या त्या सगळ्या त्या मावशीच्या हातात घातल्या. अगदी सहजपणाने... त्यात मोठे दानशूरपण केले, अशी भावना कुठेही नव्हती. हे त्यांचे साधेपण भावणारे आहे.

अशा या रामशेठ यांना ७५व्या वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा!

■ ■ ■


लोकनेते
मा.खासदार
०२ जून
रामशेठ ठाकुर साहेब
आपणास या जन्मदिनी दिर्घायुष्याच्या अनंत शुभेच्छा..!
: शुभेच्छुक :
श्री. विजय घरत
( मा. उपसरपंच ग्रामपंचायत ,गव्हाण )
( उलवे नोड-2, अध्यक्ष )
ॲड. योगिता सुहास भगत
( मा. सदस्या ग्रामपंचायत ,गव्हाण )
(अध्यक्षा- महिला मोर्चा उलवे नोड भा. ज. पा)



राजकारणावर समाजकारणाची मुद्रा उमटविणारे लोकनेते...
जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन
माजी खासदार, लोकनेते
मा.श्री.
रामशेठ ठाकूर
आपणांस या जन्मदिनी दीर्घायुष्याच्या अनंत शुभेच्छा!
J.B.S.P. SANSTHA PANVEL.RAIGAD
ज.भ.शि.प्र.संस्था
शुभेच्छुक
जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था, पनवेल
प्राचार्य डॉ. सिध्देश्वर तुकाराम गडदे
(सचिव, ज. भ. शि.प्र. सं.)
सर्व प्राचार्य, मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारीवृंद आणि विद्यार्थी


02 जून
रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सचे संस्थापक
माजी खासदार लोकनेते
मा.श्री.
रामशेठ ठाकूर
Ramsheth Thakur International Sports Complex RTISC
साहेब, आपणांस वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा !
शुभेच्छुक
रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स व संचालक मंडळ, उलवे नोड, नवी मुंबई.
मा. श्री. आमदार प्रशांत रामशेठ ठाकूर
(अध्यक्ष)
मा. श्री. परेश रामशेठ ठाकूर
(चेअरमन ॲण्ड मॅनेजिंग डायरेक्टर)
मा. श्री. यशवंत त्रिंबक देशमुख
(जनरल सेक्रेटरी )
सदस्य : श्री. रविंद्र बाळकृष्ण भगत, श्री. भार्गव रामदास ठाकूर, श्री. मनोहर लक्ष्मण ओवळेकर, श्री. शिव शंकर सुमन, श्री. स्वप्निल अरुण ठाकूर, श्री. प्रतिक भरत ठाकूर, श्री. अभिजित उत्तमराव जाधव, श्री. अमोल यशवंत देशमुख, श्री. भुषण श्रीधर ठाकूर



WISHES A VERY HAPPY BIRTHDAY
SHRI. RAMSHETH THAKUR (EX-MP)
Savings
#InvestForTheBest
BOI
Let your Savings and Happiness Grow with
BOI Savings Deposit Account
Exclusive Benefits:
Free Group Personal Accident Insurance Cover up to ₹100 Lakh*
Nil Daily Minimum Balance Requirement*
Unlimited Free Cheque Leaves*
Free Issuance of Credit Card*
100% Concession on Processing Charges for Retail Loans*
100% Locker Rent Concession*
*Terms and conditions apply
Scan the QR Code to open your Account Online or visit your nearest BOI Branch
Toll Free No.: 1800 220 229 / 1800 103 1906
Visit : www.bankofindia.co.in
Follow us on
Bank of India
Relationship beyond banking



घरच्या ग्रंथसंग्रहालयात रामशेठ...









एका निवांतक्षणी रामशेठ...






समग्र ठाकूर कुटुंबियांसोबत रामशेठ...




तुमचे नेतृत्व संघर्षाचे, स्थानिकांचे, प्रकल्पग्रस्तांचे आणि जनहिताचे...
माजी खासदार, लोकनेते
आदरणीय
रामशेठ ठाकूर
आपणांस वाढदिवसाच्या अनंत शुभेच्छा!
श्री. महादेवशेठ रामचंद्र पाटील
अध्यक्ष : हनुमान मंदिर ट्रस्ट, खानावले; भाजप ज्येष्ठ नेते
शुभेच्छुक
सौ. सुनीता महादेवशेठ पाटील
मा. सरपंच
ग्रुप ग्रामपंचायत खानावले
केशव पाटील
दीपक पाटील
चेतन पाटील
विकास पाटील

माजी खासदार, लोकनेते
मा.श्री.
रामशेठ ठाकूर
आपणांस या जन्मदिनी दीर्घायुष्याच्या अनंत शुभेच्छा!
भारतीय जनता पार्टी
श्री. रामदास ठाकूर
श्री. भार्गव ठाकूर
शुभेच्छुक
मेसर्स बी. आर. ठाकूर गव्हर्नमेंट कॉन्ट्रॅक्टर
कोपर – गव्हाण, ता. पनवेल, जि. रायगड. ऑफीस दूरध्वनी क्र.९९३०४०७७४६




WISHING YOU MANY MORE YEARS IN YOUR MISSION TO CHANGE LIVES.
02 June
Happy Birthday
SHRI. RAMSHETH THAKURJI (Ex. MP)
SAMARTH (Prabhu Ali, Panvel)
GANESH KRUPA (Opp. Nadkarni Hospital, Panvel)
JANKI (S. N. Road, Panvel)
SHRADDHA (Natyagriha Road, Panvel)
Your own world of Happiness
SNEHSHREE (Natyagriha Road, Panvel)
+91-99304 99909
+91-99304 99099
+91-80802 57175
+91-80808 65909
NEELKANTH GROUP
O: Neelkanth Group, Office No. 706-710, 7th Floor, Neelkanth Landmark, Plot No. 365/1/2, Mumbai - Pune Highway, Behind Orion Mall, Panvel - 410206.
E Mail : neelkanthassociates9099@gmail.com | neelkanthconstructions.group@gmail.com

02 June
Happy Birthday,
Shree. Ramshethji Thakur (Ex-MP)
Best wishes on your Birthday.
Wishing you another year of great accomplishments!
With Best Wishes From
SHREEYASH MATERNITY AND GENERAL HOSPITAL
ORTHOPEDIC TRAUMA AND JOINT REPLACEMENT CENTER
Paediatric Neurology Clinic
State of art infrastructure & equipments
• Fully equipped operation theatres, labor rooms
• Obstetric ultrasonography
• Laparoscopic Gynecological surgeries
• Gynecological oncosurgery
• Fertility treatment
• Pediatric Neurology Consultation
DR RAVINDRA INAMDAR
MD (OBGY)
DR MADHURI INAMDAR
MD,DGO (OBGY)
DR RAMA INAMDAR KULKARNI
DNB (OBGY)
Gynaec Laproscopic Surgery Fellowship (Seoul, Korea)
DR NEHA INAMDAR PATKI
MBBS, DNB Paediatrics, Fellowship In Pediatric Neurology, Hinduja Hosp, Mumbai
COMPREHENSIVE ORTHOPAEDIC TRAUMA, SPINE, JOINT REPLACEMENT AND ARTHROSCOPY CENTRE
DR SOURABH KULKARNI
MS Ortho (KEM Hospital)
Fellow Joint Replacement Surgery (Korea)
Advanced Hip & Knee Surgery Fellow (SICOT)
DR SARANG PATKI
MS Ortho (JIPMER),DNB Ortho
Fellow Arthroscopy , Knee & Shoulder Surgery (Italy)(ISAKOS)
Next To Bank Of India, Vijay Marg, Sector 19, New Panvel East, Navi Mumbai, Maharashtra 410206, contact no: 27452139, 27451411

# छत्रपती शिवाजी कॉलेज आणि रामशेठ ठाकूरसाहेब ऋणानुबंध



**प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे,**
**सहसचिव (उच्च शिक्षण),**
**रयत शिक्षण संस्था, सातारा**

एखादा वारकरी आयुष्यभर विठ्ठलाच्या भेटीसाठी पंढरपूरची पायी वारी करतो, तासन्‌तास रांगेत उभे राहून विठुरायाचे नामस्मरण करीत त्या ठिकाणचा अबीर बुक्का आपल्या ललाटी लावतो. यामधून त्या वारकऱ्याला जो निर्मळ आनंद मिळतो तोच आनंद छत्रपती शिवाजी कॉलेजच्या प्रांगणामध्ये आल्यानंतर मला मिळतो. शिवाजी कॉलेज म्हणजे माझ्यासाठी विठुरायाची पंढरीच आहे, अशी भावना मा. रामशेठ ठाकूरसाहेब यांनी अनेक वेळा बोलून दाखविली आहे.

छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये येणारा विद्यार्थी हा शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी समाजातून येतो. अशा उपेक्षित समाजातील मुलांना शिक्षणाची संधी मिळावी यासाठी पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. म्हणूनच बहुजन समाजातील गोरगरीब विद्यार्थी शिक्षणाच्या मुख्य प्रवाहामध्ये आला.


छत्रपती शिवाजी कॉलेजमधील स्पर्धा परीक्षा केंद्र हा ठाकूरसाहेबांचा आणखी एक आस्थेचा विषय. त्या केंद्रासाठी त्यांनी दिलेली लाखो रुपयांची मदत चिरंतन लक्षात राहण्यासारखी आहे. आपल्याला शिकविण्यासाठी असलेले प्राचार्य उनउने सर असो, प्राचार्य मा. के. यादव सर असो किंवा प्राचार्य आर.डी. गायकवाडसाहेब असो या सर्वच गुरुवर्यांविषयी कृतज्ञतेची भावना अंत:करणात अखंड वास करीत असते. कर्मवीर भाऊराव पाटील आणि रयत माऊली सौ. लक्ष्मीबाई पाटील यांनी आपल्या वसतिगृहात येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यावर आई–वडिलांचे प्रेम केले. तेवढेच प्रेम वसतिगृहातील मुलांनी कर्मवीर अण्णा आणि सौ. वहिनी यांच्यावर केले. हे नाते जसे एखाद्या स्वच्छ पाण्यासारखे नितळ होते तसेच नाते मा. रामशेठ ठाकूरसाहेबांनी वरील ऋषितुल्य गुरुवर्यांच्या संदर्भात जोपासले आहे. प्राचार्य उनउने यांच्या नावाने महाविद्यालयांमध्ये स्मृतिदालन उभा करण्याचा विषय आला तेव्हा रामशेठ ठाकूरसाहेबांनी मदत केली नसती तरच नवल. साहेबांनी लाखो रुपयांची मदत करून एक देखणे दालन उभे केले आहे.


'रयत'च्या विद्यार्थ्यांना पारंपरिक शिक्षणाबरोबरच व्यावसायिक शिक्षण, अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे शिक्षण मिळाले पाहिजे असा त्यांचा नेहमीच आग्रह असतो. छत्रपती शिवाजी कॉलेजमधील विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षण मिळावे यासाठी हॉटेल मॅनेजमेंट अॅण्ड केटरिंग हा पदवी अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी त्यांनी केलेले मार्गदर्शन आणि त्यासाठी आवश्यक शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी केलेली आर्थिक मदत यामधूनच सर्व प्रकारच्या शैक्षणिक सुविधांनी सुसज्ज असे व्यवसाय शिक्षणाचे केंद्र उभे राहिले आहे. अशा प्रकारचे अनेक शैक्षणिक उपक्रम छत्रपती शिवाजी कॉलेजच्या प्रांगणामध्ये सुरू करण्यामध्ये मा. रामशेठ ठाकूरसाहेब यांची भूमिका खूप मध्यवर्ती राहिली आहे.

रामशेठ ठाकूरसाहेब मला म्हणाले सर, मला कॉलेजचे ग्रंथालय पाहायचे आहे. आपण ग्रंथालयाकडे जाऊन येऊया का? मी आमच्या महाविद्यालयाचे ग्रंथपाल शिवाजी लोखंडे यांना कल्पना दिली की आम्ही दोन मिनिटात ग्रंथालयात येत आहोत, माझ्यासोबत आदरणीय रामशेठ ठाकूरसाहेब आहेत याची कल्पना दिली. आम्ही जेव्हा ग्रंथालयात पोहोचलो तेव्हा ग्रंथालयामध्ये असणारी पुस्तकांची संख्या, त्याठिकाणी चालणारे कामकाज, शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील सर्वात मोठे ग्रंथालय म्हणून असणारा लौकीक, अत्यंत दुर्मिळ ग्रंथांचा असणारा संचय या सर्व घटकांची माहिती लोखंडे सरांनी आणि मी रामशेठ ठाकूरसाहेबांना दिली. त्यांनी मी या ठिकाणी शिक्षण घेत होतो. त्याकाळातील ग्रंथालय आणि आजचे ग्रंथालय यामध्ये झालेला बदल आम्हाला सांगितला.

कोणत्याही कॉलेजचे ग्रंथालय हा त्या कॉलेजचा आत्मा असतो. कॉलेजचे ग्रंथालय हे समृध्दच असायला पाहिजे. एवढे ग्रंथांवर प्रेम करणारे ठाकूरसाहेब मी पहिल्यांदा पाहिले. ग्रंथालय समृद्ध होते, मात्र त्या ठिकाणी अपुऱ्या असणाऱ्या भौतिक सुविधा त्यांच्या नजरेतून सुटल्या नाहीत. संपूर्ण ग्रंथालय पाहून झाल्यानंतर त्यांनी स्पर्धा परीक्षेचे ग्रंथालय पाहण्याची इच्छा व्यक्त केली. आम्ही ते ग्रंथालय पाहण्यासाठी गेलो. पश्चिम महाराष्ट्रातील एक आदर्श स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र म्हणून याचा लौकिक पसरला होता. स्पर्धा परीक्षा केंद्राच्या ग्रंथालयात असणारी पुस्तके तेवढीच दुर्मिळ आणि उपयुक्त होती म्हणूनच या केंद्रातून शेकडो विद्यार्थी महाराष्ट्राच्या प्रशासकीय क्षेत्रात काम करत आहेत याचा मला अभिमान वाटतो अशा भावना त्यांनी यावेळी व्यक्त केल्या. या ग्रंथालयाच्या पाहणीत तीन तासांचा वेळ कसा गेला हे आंम्हालाही कळाले नाही. या दोन्ही ग्रंथालयातून बाहेर पडताना रामशेठ ठाकूरसाहेब मला म्हणाले सर, या ग्रंथालयातील पुस्तके खूप महत्त्वाची आणि दुर्मिळ आहेत. या विद्यार्थ्यांना आणखी चांगल्या भौतिक सुविधा आपण दिल्या पाहिजेत. मी या दोन्ही ग्रंथालयांसाठी २० लाख रुपये देतो. आपण ही ग्रंथालये आणखी चांगली करूया. ग्रंथालयातून बाहेर पडताना या महान व्यक्तीच्या तोंडातून बाहेर पडलेले शब्द आम्ही जेव्हा प्राचार्यांच्या केबीनपर्यंत पोहचलो तेव्हा ते असे म्हणाले. सर, २० लाखांऐवजी मी ४० लाख रुपये देतो. माझ्यासारख्या प्राध्यापकाच्या आनंदाला पारावर उरला नाही. अशा प्रकारचे शब्द साहेब म्हणून गेले आणि विशेष म्हणजे काही दिवसात तो धनादेश कॉलेजमध्ये आला. माझ्या जीवनात एखाद्या व्यक्तीने शिक्षण क्षेत्रावर एवढी श्रध्दा ठेवून काम केलेले मी कधीच पाहिले नव्हते. हळूहळू आमच्या मधील ऋणानुबंध अधिक घट्ट होत गेले. एवढ्या प्रचंड मोठ्या उंचीच्या माणसाने माझ्यासारख्या प्राध्यापकाला नावानिशी ओळखणे ही खूप मोठी गोष्ट आहे. **(पान १८ वर..)**



# छत्रपती शिवाजी कॉलेज आणि रामशेठ ठाकूरसाहेब ऋणानुबंध

पान १७ वरून..


२०१७चा प्रसंग म्हणजे आपल्या मातृसंस्थेवर एखाद्या विद्यार्थ्यांची किती भक्ती असू शकते याचे एक उदाहरण आहे. छत्रपती शिवाजी कॉलेज सर्व तयारीनिशी नॅकच्या तिसऱ्या मूल्यांकनाला सामोरे जात होते. नॅक पिअर टिमच्या महाविद्यालय भेटीमध्ये लंच ऑन मिटींग होती. यामध्ये संस्थेचे प्रतिनिधी म्हणून रामशेठ ठाकूर उपस्थित होते. त्यांच्याबरोबर मा.आ. पतंगरावजी कदमसाहेब, मा.डॉ.अनिल पाटीलसाहेब ही मान्यवर मंडळी उपस्थित होती. लंच ऑन मिटींगच्या दरम्यान संस्थेचे शैक्षणिक कार्य, संस्थेने समाजासाठी दिलेले योगदान यासंदर्भात विस्ताराने चर्चा झाली. ही मिटींग संपल्यानंतर नॅक पिअर टीम माजी विद्यार्थी मेळाव्यासाठी निघून गेली आणि महाविद्यालयाचे प्राचार्य, मी आणि रामशेठ ठाकूरसाहेब महाविद्यालयाच्या प्रांगणात सहज फिरण्यासाठी गेलो. तेव्हा साहेबांना एक उणिव जाणवली आणि ती त्यांनी बोलून दाखविली. रामशेठ ठाकूरसाहेब म्हणाले आपले महाविद्यालयाचे स्पर्धा परीक्षा केंद्र एवढया चांगल्या पद्धतीने आपण चालवतो आहे तर या विद्यार्थ्यांना अधिक चांगल्या भौतिक सुविधा आपण दिल्या पाहिजेत. चांगल्या लेक्चर हॉल, समृद्ध ग्रंथालय, उत्कृष्ट दर्जाची अभ्यासिका आणि तज्ज्ञ मार्गदर्शक हे या विद्यार्थ्यांना देणे आपले काम आहे. तुम्ही असे करा, महाविद्यालयाच्या परिसरात ज्याठिकाणी मोकळी जागा आहे, त्या ठिकाणी चांगल्या इमारतीचे नियोजन करा, मी त्यासाठी रुपये ८० लाख देतो. साहेबांनी ८० लाख देण्याचे मान्य केल्यानंतर आम्ही इमारतीचे नियोजन केले, नियोजन करत असताना साहेबांकडून जेवढी आर्थिक मदत मिळेल तेवढ्यात बसेल एवढी इमारत बांधूया, पण नियोजन करत असताना पाच मजली इमारतीचे नियोजन करूया. हळूहळू त्या इमारतीचा विस्तार करता येईल असे नियोजन केले. मा. रामशेठ ठाकूरसाहेब यांच्यापुढे आम्ही त्या इमारतीचे बजेट आणि डिझायनिंग त्यांच्या समोर ठेवले ते डिझायनींग पाहिल्याबरोब साहेबांनी यासाठी मी एक कोटी ८० लाख देतो असे त्क्षणी जाहीर केले.





आपणास विशेष आश्चर्य वाटेल. प्रत्यक्ष त्या इमारतीच्या पायाभरणीसाठी आम्ही जेव्हा एकत्र आलो. तेव्हा प्राचार्यांनी मा. रामशेठ ठाकूर यांना बांधकामाचे नियोजन सांगितले. सध्या आम्ही या एकूण डिझायनिंगमधील अर्धीच पूर्ण करणार आहोत. भविष्यात जसजसे पैसे येतील तसे आम्ही ती पूर्ण करणार आहोत. हे ऐकताच या महान दानशूर व्यक्तीने सहजपणे सांगून टाकले की, ‘सर, इमारत अशी अर्धवट बांधू नका, या इमारतीसाठी जेवढा खर्च येईल तो खर्च मी देईल’. या इमारतीचे एकूण बजेट सुमारे सहा कोटी रु. झाले. एका वर्षात ही टोलेजंग इमारत उभी राहिली. छत्रपती शिवाजी कॉलेजच्या वैभवात भर टाकणारी आणि विद्यार्थ्यांना सर्वोत्कृष्ट दर्जाच्या भौतिक सुविधा देणारी इमारत एका वर्षात पूर्ण झाली. एका हाताने दिलेले दान दुसऱ्या हातालासुद्धा कळू नये. इतक्या सहजतेने या इमारतीचा कोटावधी रूपयांचा खर्च ठाकूरसाहेबांनी लीलया केला. आज त्या इमारतीमध्ये मीडिया आणि इंटरटेनमेंट आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सर्वोत्कृष्ट सुविधा पुरविण्यात आली आहे. संस्थेने त्यांच्याबद्दलची कृतज्ञता म्हणून त्यांची इच्छा नसताना आणि नाव देण्यासाठी त्यांचा विरोध असतानासुद्धा संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलने या इमारतीस ‘लोकनेते मा. रामशेठ ठाकूर भवन’ असे नाव देण्याचा ठराव केला. आज सातारा शहरातील आणि रयत शिक्षण संस्थेच्या अनेक महाविद्यालयांपैकी एक उत्तम दर्जाचे महाविद्यालय म्हणून छत्रपती शिवाजी कॉलेजकडे पाहिले जाते. याचे श्रेय रामशेठ ठाकूरसाहेब यांना दिले तर ते अनुचित होणार नाही.

एकदा साहेबांना मी प्रश्न केला, साहेब! आपण एवढ्या उदार मनाने संस्थेच्या अनेक शाखांना आर्थिक मदतीसह सर्व प्रकारची मदत करत असता याच नेमके गमक काय आहे ? त्यावर साहेबांनी दिलेले उत्तर अत्यंत मार्मिक आहे. ते म्हणाले, ज्या समाजाने आपल्याला घडवले. आपल्यावर चांगले संस्कार केले, त्या समाजाचे आपण काही देणे लागतो. या जन्मात आपण जे कमवतो, ते अत्यंत निष्ठेने, प्रामाणिकपणे आणि कष्टाने कमवतो. त्यावर या समाजाचासुद्धा अधिकार आहे. ज्या संस्थेने माझ्यावर ज्ञानाचे संस्कार केले. याच ज्ञानाच्या शिदोरीवर मी शिक्षक झालो. उद्योग आणि व्यवसाय क्षेत्रात पदार्पन केले आणि माझ्या प्रामाणिकपणाच्या सामर्थ्यावर खूप काही मिळाले. ज्या संस्थेने मला जे काही दिले त्या संस्थेसाठी सढळ हाताने देण्यात आणि दुसऱ्याच्या चेहऱ्यावर आनंद शोधण्यात मला आनंद प्राप्त होतो. हेच माझ्या जगण्याचे गमक आहे. म्हणून मला मिळणाऱ्या पैशापैकी जेवढे म्हणून देता येतील तेवढे देण्यात मला आनंद वाटतो. ठाकूरसाहेबांच्या शैक्षणिक कार्याला अंतःकरणपूर्वक सलाम करावा असे वाटते.

■ ■ ■















# मोखाडा महाविद्यालयाचे आधारस्तंभ

माजी खासदार रामशेठ ठाकूरसाहेबांचे सामाजिक व राजकीय कार्याबरोबर शैक्षणिक कार्यात प्रचंड मोठे योगदान आहे. रयत शिक्षण संस्थेच्या लोकनेते रामशेठ ठाकूर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय मोखाडा, जि. पालघर या महाविद्यालयात आयक्युएसी समन्वयक म्हणून काम करत असताना सन २०२२मध्ये रामशेठ ठाकूरसाहेब व माझी पहिली भेट झाली. शहराप्रमाणे आदिवासी विद्यार्थ्यांच्या सुविधांमध्ये कोणतीही तफावत राहता कामा नये ही साहेबांची भूमिका होती.

तेव्हा महाविद्यालयाचे नॅक मूल्यांकन झालेले नव्हते. साहेबांनी सीडीसी मिटिंगमध्ये सांगितले की, महाविद्यालयाचे नॅक मूल्यांकन पूर्ण होण्यासाठी इमारत, प्रयोगशाळा व जे काय लागेल ते उभे करा व त्यासाठी लागणाऱ्या निधीची काळजी करू नका, सर्व पैसा मी देईन एवढ्या एका वाक्यातच त्यांनी विश्वास व्यक्त करून प्रचंड पाठबळ दिले आणि महाविद्यालयासाठी कुठलाही निधी कमी पडू दिला नाही.

रामशेठ ठाकूरसाहेबांचे झाडांवर व निसर्गावर असलेले प्रेम मला एका अनुभवातून सांगावेसे वाटते. जेव्हा महाविद्यालयामध्ये प्रशासकीय इमारत बांधायची होती त्या वेळेस तेथे एक जांभळाचे उंच झाड होते. साहेबांनी ते बघितले आणि लगेच सांगितले इमारत थोडी बाजूला सरकली तरी चालेल, परंतु हे जांभळाचे झाड तोडायचे नाही.

जून २०२४पासून प्र.प्राचार्यपदाची धुरा सांभाळताना रामशेठसाहेबांबद्दल आलेले अनुभव मी इथे नमूद करू इच्छितो. मोखाडा महाविद्यालयाचे आर्थिक परिस्थिती नाजूक असल्यामुळे सीडीसी मिटिंगमध्ये बऱ्याचशा आर्थिक विषयांवर चर्चा व्हायची. त्या वेळेस साहेब कुठल्याही गोष्टीचा विचार न करता महाविद्यालयासाठी भरघोस निधी देणगी म्हणून देत. रयत शिक्षण संस्थेच्या ध्येय धोरणानुसार सर्व महाविद्यालयांमध्ये इंटरॲक्टिव्ह पॅनल बसविणे गरजेचे होते. आम्ही साहेबांकडे या विषयावर चर्चा करण्यासाठी गेलो. साहेबांनी एका क्षणात १२ लाख रुपयांचा चेक आमच्याकडे सुपूर्द केला व आम्हाला सांगितले की, महाविद्यालयाच्या सर्व वर्गामध्ये व प्रयोगशाळेमध्ये इंटरॲक्टिव्ह पॅनल बसवून घ्या. मोखाड्यातील विद्यार्थ्यांना सर्व अत्याधुनिक सुविधा मिळाल्या पाहिजे. आमच्यासारखे अनेकजण साहेबांकडे मदत मागण्यासाठी दररोज येत असतात आणि दारी आलेल्या कोणालाही साहेब रिकामी हाती जाऊ देत नव्हते. एवढे सर्व असून सुद्धा साहेबांचा शांत स्वभाव आणि साधे राहणीमान हे सर्वांनाच भावून जाते.

वार्षिक पारितोषिक कार्यक्रमाच्या निमित्ताने साहेब महाविद्यालयामध्ये उपस्थित होते, तेव्हा त्यांच्या लक्षात आले की मोखाडा परिसरातील विद्यार्थ्यांमध्ये खूप चांगले कलागुण आहेत आणि त्यांना वाव देणे गरजेचे आहे. त्यासाठी त्यांनी लगेच महाविद्यालयात संगीत व इतर साहित्य घेण्यासाठी रुपये २० लाखांची देणगी जाहीर केली. याव्यतिरिक्त साहेबांच्या महाविद्यालयातील भेटीदरम्यान ते विद्यार्थी, शिपाई, शिक्षकेतर कर्मचारी, प्राध्यापक, प्राचार्य या सर्वांची आवर्जून विचारपूस करतात.

लोकनेते रामशेठ ठाकूर महाविद्यालय हे महाराष्ट्र शासनाच्या परिसस्पर्श योजनेंतर्गत मुंबई विद्यापीठाने पालघर जिल्ह्यातील महाविद्यालयांना मार्गदर्शनासाठी नियुक्त केलेले प्रमुख महाविद्यालय आहे. तसेच नॅक मूल्यांकनांमध्ये ए प्लस ग्रेड व ३.४३ सीजीपीए मिळवणारे पालघर जिल्ह्यातील एकमेव महाविद्यालय आहे. याचे श्रेय जाते ते लोकनेते रामशेठ ठाकूर या दानशूर व्यक्तिमत्वाला. मोखाडा या दुर्गम भागात साहेब वर्षातून चार ते पाच वेळा भेट देत असतात ते फक्त आदिवासी बांधवांविषयीची आत्मियता, तळमळ आणि त्यांच्या कल्याणाचा ध्यास यामुळेच.

पालघर जिल्ह्यातील उत्कृष्ट व सुंदर महाविद्यालय म्हणून ओळख, त्याचबरोबर महाविद्यालयासाठी आवश्यक असणारी प्रशस्त इमारत, अद्ययावत प्रयोगशाळा, सुसज्ज वर्ग खोल्या, संशोधन लॅब, कम्प्युटर लॅब, प्रशासकीय इमारत, खेळाचे मैदान, बोटॅनिकल गार्डन इत्यादी सर्व मोखाडा या दुर्गम व डोंगराळ माळरानावर उभे आहे ते केवळ रामशेठ ठाकूरसाहेबांच्या थोर दातृत्वातून. त्यांना वाढदिवसानिमित्त मन:पूर्वक शुभेच्छा!



**–डॉ. ए. एन. चांदोरे,** प्र. प्राचार्य, लोकनेते रामशेठ ठाकूर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, मोखाडा




















# बहुजनांचे आधारस्तंभ व वंचिताचे संचित



-प्रा. बाळासाहेब लेंगरे,
*कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, वाशी*

रयत शिक्षण संस्थेला आपल्या दानशुरतेने मोठं पाठबळ देणारे, नावातच राम आणि शेठ असलेले असे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा २ जून २०२५ रोजी ७५वा वाढदिवस आहे. असं म्हटलं जातं की, प्रत्येक व्यक्तिच्या जीवनामध्ये हृदयातल्या वेदना जाणणारं कुणीतरी असावं लागतं, डोळ्यातील अश्रुंचं मोल ओळखणारं कुणीतरी असावं लागते. त्याचप्रमाणे सुखामध्ये साथसोबत आणि दु:खामध्ये सामर्थ्य देणारं कुणीतरी असावं लागतं. निश्चितपणे मिडलक्लास हौसिंग सोसायटी प्लॉट नं. ५५ येथे लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या निवासस्थानी गाऱ्हाणे घेऊन आलेल्या प्रत्येक व्यक्तिला याचा अनुभव आलेला आहे.

आपण लक्ष्मी आणि सरस्वती यांची वेगवेगळी पूजा करतो, मात्र सरस्वतीकडूनच आपण लक्ष्मीकडे जातो. शिक्षण घेऊनच आपण धन कमावतो. म्हणजेच ज्ञानातून अर्थाजनाकडे जातो. रामशेठ ठाकूरसाहेबांनी छत्रपती शिवाजी कॉलेज सातारा येथे कमवा आणि शिका या योजनेतून शिक्षण पूर्ण करून व्यवसायात चांगला जम बसवून रयत शिक्षण संस्थेस आजपर्यंत कोट्यवधी रुपयांची देणगी दिली आहे. म्हणूनच ते रयत शिक्षण संस्थेसाठी आधुनिक युगातील कर्ण आहेत. शिक्षणसाठी समर्पण आणि त्याग हे गुण त्यांनी कर्मवीर अण्णांकडून घेतले आहेत. साताऱ्यात 'रामशेठ ठाकूर भवन' ही वास्तू रामशेठ ठाकूरसाहेबांनी दिलेल्या देणगीतून उभी राहिली आहे. बहुजन समाजाच्या न्याय्य हक्कांसाठी भूमिका पार पाडणारे समाज उद्धारक, दीन-दलित, आदिवासी, भटक्या-विमुक्त व कष्टकरी कामगार इत्यादी वंचितांचे संचित बनून समाजसेवेचे व्रत रामशेठ ठाकूरसाहेबांनी अखंडपणे तेवत ठेवले आहे.


असे म्हणतात की, परिसाचा स्पर्श झाल्यावर त्या वस्तूचे सोने होते. रामशेठ ठाकूरसाहेब यांच्या सानिध्यात जो जो व्यक्ती आला त्याच्या आयुष्याचे सोने झाले. सामान्य माणसांच्या अडचणीत सर्वांना मदत करणारा हा 'शेठ' नसून दातृत्वाचा 'राम' आहे. त्यांनी कधी आपला पोशाख बदलला नाही, पायातली चप्पल बदलली नाही. महाराष्ट्राच्या प्रत्येक जिल्ह्यात एक तरी रामशेठ ठाकूर असायला हवा. मोखाडा येथील महाविद्यालय हा रामशेठ ठाकूरसाहेबांच्या आयुष्याचा परमोच्चबिंदू आहे. रामशेठ ठाकूरसाहेब यांच्याकडे सत्तेतील कोणतेही पद नाही, परंतु तरीही त्यांच्या दैनंदिनीमधील फिरता रंगमंच आणि मानाची खुर्ची अजूनही शाबूत आहे. समाजातील प्रत्येक घटकाला आपल्या व्यासपीठावर ते मानाच्या स्थानी हवे असतात. संकटकाळात महत्त्वाचा पर्याय म्हणून रामशेठ ठाकूरसाहेब यांच्याकडे पाहिले जाते.

समाजाचा, समाजातील शेवटच्या घटकाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी जो नेता आपलं तन, मन, धन, सेवा, वेळ आणि हृदय देतो तथा सर्वस्व देतो त्याच्या कार्याला शब्दापेक्षा विकासाभिमुख कृतिशील अशी धार असते. अशा विकासप्रिय नेत्याला जनता कधीच विसरत नाही. हा नेता सदा सर्वकाळ चिरंतन राहतो. रामशेठ ठाकूरसाहेबांचे विचार आणि कार्यप्रणाली त्यांच्याकडे असलेल्या काळाच्याही पुढे पाहण्याच्या दृष्टीतून येते. कर्मवीर अण्णांच्या विचारांचा वारसा पुढे नेणारे सच्चे रयतसेवक म्हणून रामशेठ ठाकूरसाहेबांची ओळख आहे.

असं म्हटलं जातं की, जनसेवा हीच ईश्वरसेवा! म्हणूनच ते जनसेवेचे कार्य करतात. प्रशासनावर कमालीची पकड, खडान्‌खडा माहिती, माहितीचे विपुल स्त्रोत, दूरदृष्टी, पनवेलला काय हवे काय नको याची चांगलीच जाण रामशेठ ठाकूरसाहेबांना आहे. जनसेवा, शिक्षण क्षेत्रातील कार्य याबद्दल त्यांना अनेक पुरस्कार मिळालेले आहेत.


कुशल संघटक आणि माणुसकीच्या झऱ्यातील ओलाव्याने इतरांच्या मनातील वाळवंट हिरवेगार करणारे उपक्रमशील लोकनेता म्हणून ज्यांनी आपल्या कर्तृत्वाची अक्षरमुद्रा रयतेच्या मनावर उमटवली ते म्हणजेच रामशेठ ठाकूरसाहेब. एका विचारवंताने असे म्हटले आहे की, मी आगीनं कुणाला तरी जाळलेलं पाहिलं आहे, मी पाण्यानं कुणाला तरी बुडविलेलं पाहिलं आहे, पण सदगुणांचा नाश केलेला मी कुणालाही पाहिलेलं नाही. सर्वांना बांधून ठेवण्याची रामशेठ ठाकूरसाहेबांची वृत्ती अवाक् करणारी आहे. त्यांचा चेहरा नेहमी टवटवीत असतो तसेच वागणे आणि बोलणे सकारात्मक असते. प्रसिद्ध गीतकार गुरू ठाकूर यांच्या दोन ओळी आहेत. 'किती संपली, किती राहिली, व्यर्थ वयाचा आढावा, किती जोडली मने, माणसे परीघ याचा वाढावा.' वयाच्या वाढत्या आकड्यासोबत जिव्हाळ्याचा हा परीघदेखील वाढत जातो.

संत नामदेवरायांच्या अभंगानुसार ज्याची कल्पनाही करता येणार नाही एवढं आयुष्य रामशेठ ठाकूरसाहेबांना पांडुरंग परमात्मा प्राप्त करून देवो याच अमृत महोत्सवी वाढदिवसाच्या शुभेच्छा! सोनेरी सुर्याची सोनेरी किरणे, सोनेरी किरणांचा सोनेरी प्रकाश, सोनेरी दिवसाच्या अमृत महोत्सवी दिनी सोनेरी शुभेच्छा!





















# उलवे पुष्पक नोडमध्ये सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर मराठी माध्यम विद्यालयाच्या इमारतीचे भूमिपूजन




**पनवेल :** उलवे पुष्पक नोडमध्ये रयत शिक्षण संस्थेच्या सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर मराठी माध्यम विद्यालयाची उभारणी करण्यात येत असून या विद्यालयाच्या इमारतीचा भूमिपूजन सोहळा सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून रविवारी झाला. रयत शिक्षण संस्थेचे व्हाईस चेअरमन ॲड. भगीरथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर व त्यांची पत्नी शकुंतला ठाकूर यांच्या हस्ते हे भूमिपूजन करण्यात आले. या सोहळ्यास आमदार प्रशांत ठाकूर, वर्षा प्रशांत ठाकूर, महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, अर्चना परेश ठाकूर, अमोघ ठाकूर, आदेश ठाकूर, अपूर्व ठाकूर, आदित्य ठाकूर यांच्यासह ठाकूर कुटुंबिय, पदाधिकारी, नागरिक उपस्थित होते. **(वृत्त उद्याच्या अंकात)**



























दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com

# उंच भरारी घेणाऱ्यांना आभाळाचे भय नसते



एका कवीने म्हटले आहे, 'चालण्यासाठी वाट असते, वाटेसाठी चालणं नसत, उंच भरारी घेणाऱ्यांना आभाळचे भय नसते, करण्यासारखे खूप आहे उमेद मात्र हवी, आभाळाएवढं ध्येय आहे, जिद्द मात्र हवी.' त्याप्रमाणे ध्येयहीन जीवन म्हणजे जणू दिशाहीन नौकाच, प्रत्येक व्यक्तीचे जीवनात एक ध्येय असते. त्या ध्येयापर्यंत पोहचण्याचा प्रत्येकजण प्रयत्न करीत असतो. त्या प्रयत्नांना योग्य विचारांची जोड मिळाल्यास ध्येय पूर्ण होतात हे आपल्याला रामशेठ ठाकुर यांचे कार्य पाहिल्यावर समजते.

रामशेठ ठाकूर लोकमान्य लोकनेता आहेत. त्यांनी गरिबीत जीवन जगत शून्यातून विश्व निर्माण केले. प्रा. एन.डी. पाटील यांच्या शब्दात सांगायचे, तर रामशेठ ठाकूर निस्वार्थी, निगर्वी अशी मूर्ती आहे. माणसे, पैसा, मानाने मोठी असतात, पण रामशेठ ठाकूर हे माणूस म्हणून मोठे आहेत. प्रत्येक गोष्ट चांगली झाली पाहिजे आणि त्याचा समाजाला उपयोग व्हावा हा त्यांचा हट्टच असतो. जीवनात अनेक प्रसंग त्यांनी अनुभवले, कठीण दिवस काढले. आई–वडील संत परंपरेतील आणि स्वच्छतेचे भक्त होते, याचे रामशेठना समाधान आहे. ज्येष्ठ नेते एन. डी. पाटील, जनार्दन भगतसाहेब यांना ते गुरूस्थानी मानतात. रयत शिक्षण संस्थेमध्ये पैसा महत्त्वाचा नाही, तर माणूस महत्त्वाचा आहे, ही मिळालेली शिकवण त्यांची प्रेरणा ठरली. 'रयत' त्यांच्या अंगात रूजली आणि 'रयत'मुळेच आपण घडलो असे ते अभिमानाने सांगतात.

अत्यंत बिकट परिस्थितीत काबाडकष्ट करीत कमवा आणि शिका या कर्मवीर अण्णांच्या शिकवणीतून लोकनेते रामशेठ ठाकूर घडले. कर्मवीर अण्णांच्या 'रयत'मध्ये शिक्षणाचे बाळकडू मिळाल्याने त्यांच्या शैक्षणिक आणि वैचारिक पातळीला प्रचंड बळ मिळाले. कर्मवीर अण्णा, ज्येष्ठ विचारवंत एन.डी. पाटील, लोकनेते दि.बा. पाटील, पिताश्री चांगू काना ठाकूर, मातोश्री भागुबाई ठाकूर, थोर समाजसुधारक जनार्दन भगत अशा व्यक्तिमत्त्वांचे मार्गदर्शन लोकनेते रामशेठ ठाकूर यांना लाभले. त्यामुळे माणूस आणि माणुसकी जपण्याचे काम त्यांच्याकडून कायम होत असून खुली किताबप्रमाणे त्यांचे आयुष्य आहे.

राजकारणापेक्षा समाजकारणाला महत्व देताना रामशेठनी कर्तृत्व आणि दातृत्वही जपले. लहानपणी गरीबीचे दिवस पहिल्याने आज उद्योजक झाल्यावर आपल्याकडे आज जे आहे ते परमेश्वराने दिले आहे ते आपण वाटून टाकतो आणि परमेश्वर आपल्या आणखी देतो असे ते म्हणतात. याचा प्रत्येय पनवेल आणि रायगड जिल्ह्यातील अनेकांना आला आहे. एखाद्या मुलाचे शिक्षण आर्थिक अडचणीमुळे थांबत असल्यास त्याला लागणारी मदत त्यांच्याकडून केली जाते. त्यामुळे असे अनेक युवक आज आपले उच्च शिक्षण पूर्ण केलेले आणि करताना आपल्याला दिसतात.

**नितीन देशमुख, पनवेल**

समाज सुधारायला हवा असेल तर शिक्षण हे महत्त्वाचे आहे. त्यासाठी आधुनिक शिक्षणाची विचारधारा माझ्या भागातील शाळातून दिल्याशिवाय समाजाचा विकास साधणार नाही याची स्व. जनार्दन भगत यांना जाणीव झाली होती. शिक्षणाची सर्वांना समान संधी मिळायला हवी यासाठी त्यांच्या अंतरीची तळमळ त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती, परंतु दुर्दैवाने त्यांचे स्वप्न त्यांच्या हयातीत पूर्ण होऊ शकले नाही. त्यांचे अपूर्ण राहिलेले स्वप्न आणि ध्येय पूर्ण करण्याचा निर्धार त्यांचे जावई लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी स्वतः घडा आणि दुसऱ्यांनाही घडवा हा संदेश घेऊन पूर्ण करण्याचे ठरवले. त्यासाठी ३० मार्च १९९२ रोजी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना केली. विद्या विनयेन शोभते या ब्रीदवाक्याचा दीप हाती घेऊन या संस्थेमार्फत समाजातील सर्व घटकांच्या उन्नतीच्या कार्यास त्यांनी सुरुवात केली.

देशाचे भवितव्य हे शिक्षणाच्या गुणवत्तेवरच अवलंबून असते. शिक्षणाबाबत उपेक्षा किवा कोणतीही उदासिनता देशाच्या भवितव्याला घातक ठरू शकते हे जनार्दन भगत शिक्षण प्रसारक मंडळाचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी ओळखल्याने संस्थेच्या माध्यमातून शिक्षण प्रसाराचे कार्य अखंडपणे सुरू ठेवले आहे. संस्थेच्या शाखांमध्ये दरवर्षी होणारी वाढ हे त्याचे निर्देशक आहे. त्यामुळेच पंचवीस वर्षापूर्वी संस्थेने लावलेल्या रोपट्याचा आज वटवृक्ष झालेला आज आपल्याला पहायला मिळत आहे. सन २०१८मध्ये शासनाने सीकेटी महाविद्यालयाला स्वायत्त विद्यापीठ म्हणून मान्यता दिल्यामुळे संस्थेच्या शिरपेचात मनाचा तुरा रोवला गेला आहे.

पनवेलमधील शैक्षणिक, सामाजिक व संस्कृतिक क्षेत्रामध्ये शहरीकरणामुळे आणि औद्योगीकरणामुळे झपाट्याने बदल होत आहेत. देशाच्या विविध प्रांतातून विविध संस्कृतीचे लोक येथे स्थायिक होत आहेत. त्यावेळी स्थानिक विद्यार्थी टिकावा त्याला आत्मसन्मानाने शिक्षण मिळावे आणि विविध भागातून, राज्यातून आलेल्या विद्यार्थ्यांनाही दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी स्व. जनार्दन भगत यांचे शून्यातून विश्व निर्माण करण्याचे ध्येय, शिक्षणावरील त्यांचे नि:सिम प्रेम, गुणवत्तेचा ध्यास व शिक्षणाच्या माध्यमातून तळागाळातील दीनदुबळ्यांचा, गोरगरिबांचा विकास झाला पाहिजे हे स्वप्न स्व.जनार्दन भगत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून पूर्ण केलेले आपल्याला पहायला मिळते.

महाभारतात कौरव–पांडव युध्द सुरू होण्यापूर्वी श्रीकृष्णाकडे मदत मागायला गेले. तेव्हा त्याची फौज कौरवांनी मागितली, तर पांडवांनी श्रीकृष्णाला मागितले हे आपल्याला माहीत आहे, पण आजच्या आधुनिक युगात प्रशांतजी आणि परेशजी तुम्ही रामशेठ आम्हाला द्या, बाकी तुम्ही दोघे पहा, अशी मागणी रयत शिक्षण संस्थेतर्फे पै. इस्माईलसाहेब मुल्ला पुरस्काराने माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांना सातारा येथे सन्मानित करण्यात आले त्यावेळी त्यांच्या कर्तृत्वाने भारावलेले 'रयत'चे तत्कालीन चेअरमन डॉ. अनिल पाटील यांना करण्यावाचून राहवले नाही. यावरून त्यांचे कर्तृत्व आणि दातृत्व किती मोठे आहे हे लक्षात येते. अशा या लोकनेत्याला वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना त्यांना दीर्घायुष्य लाभो हीच ईश्वरचरणी प्रार्थना!


लोकनेते, माजी खासदार **मा. श्री. रामशेठ ठाकूर** यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा !

**Dr. B. J. BIRMOLE**
MS., M.Ch., D.N.B.
PAEDIATRIC SURGEON



PANVEL :
**BIRMOLE HOSPITAL**
2. Vastu Apt. Thana Naka,
Panvel-410206, Dist Raigad.
Tel. 27455486, 27480547
Mon. to Sat. - 11 a.m. to 2 p. m.


VASHI :
**MORALWAR CHILD CARE**
310, Nariman Vyapar Kendra,
Above Navratna Hotel, Sec. 17, Vashi.
Tel . : 55911009, 27890462
Tue. & Fri. - 5 p.m. to 7 p.m.


HONORARY : MGM Hospital (Vashi) : 27822203, 27821659
Paramount Hospital (Panvel) : 2745 5610, 2745 3825

Email : drbjbirmole@hotmail.com
Resi. : 27454759























# शिक्षण क्षेत्रातील द्रष्टे नेते

**प्राचार्य, डॉ. सिद्धेश्वर तुकाराम गडदे,**
सचिव, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था, पनवेल



पनवेल-उरण परिसरामध्ये गेल्या ५० वर्षांमध्ये आमूलाग्र बदल घडला. गावच्या वेशीपर्यंत लहान-मोठे उद्योगधंदे, कारखाने, रेल्वे, विमानतळाचे काम आणि गृहनिर्माण संकुले पोहचली आहेत. हा बदल या परिसराचे 'भूमिपुत्र' माजी खासदार रामशेठ ठाकूरसाहेब यांच्या त्वरित लक्षात आला. आपल्या परिसरात वेगवेगळे उद्योगधंदे, कारखाने, व्यवसाय स्थापन होऊन येथे उच्चशिक्षित, प्रशिक्षित आणि कार्यकुशल उमेदवारांची आवश्यकता भासणार, हे सदैव वेगळी दृष्टी असणाऱ्या लोकनेत्याने बरोबर ओळखले.

रायगडचे माजी खासदार रामशेठ ठाकूरसाहेब मुळातच कर्मवीरांच्या रयत शिक्षण संस्थेतील 'कमवा आणि शिका' योजनेच्या माध्यमातून तावून सुलाखून निघालेले व्यक्तिमत्व. सातारा येथे छत्रपती शिवाजी महाविद्यालयामध्ये शिकताना महाराष्ट्रातील नामवंत व्यक्तिमत्वांचा सहवास आणि त्यांच्या प्रगलभतेचे व समाजाकडे बहुसमावेशक व निखल दृष्टिकोनातून पाहण्याचे बाळकडू लाभलेले हे परिसस्पर्शी व्यक्तिमत्व. त्यामुळेच अगदी विद्यार्थीदशेपासूनच फुले-शाहू-आंबेडकर यांच्या प्रभावशाली विचारांचा पगडा त्यांच्या व्यक्तिमत्वात जाणवतो. म्हणूनच शिक्षणाबद्दलची आत्मियता त्यांच्या मनात निर्माण झाली आणि आपल्या नोकरीची सुरुवात त्यांनी शिक्षकी पेशानेच केली.

पनवेल-उरण परिसरातील समाजाला येथील परिस्थितीनुसार आवश्यक असणाऱ्या शिक्षणाची सोय उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने त्यांनी सेवाकार्याचे सारस्वत स्व. जनार्दन भगतसाहेब यांच्या आशीर्वादाने जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था, पनवेलची १ जानेवारी १९९२ रोजी सहकाऱ्यांच्या मदतीने स्थापना केली. या संस्थेची स्थापना करताना रामशेठ ठाकूरसाहेबांना आपल्या डोळ्यांसमोर इथल्या स्थानिक व कष्टकरी समाजातील विद्यार्थी दिसत होतेच, पण त्याचबरोबर विविध प्रांतातून येथे स्थायिक होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या दर्जेदार शिक्षणाची आसही दिसत होती. संस्थेने आपल्या कार्याचा श्रीगणेशा गव्हाण कोपर येथे मोरू नारायण म्हात्रे विद्यालय व नंतर तुकाराम नारायण घरत ज्यु. कॉलेज, गव्हाण हे इंग्रजी माध्यमाचे विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय स्थापन करून केला. या विद्यालयामध्ये पूर्व प्राथमिकपासून बारावीपर्यंत इंग्रजी माध्यमातून धडे घेत आहेत.

ग्रामीण भागातील शिक्षण कार्यातील यशानंतर रामशेठ ठाकूरसाहेबांनी आपली नजर पनवेल परिसराकडे वळवली. दर्जेदार शिक्षासंकुल स्थापन करून विद्यार्थ्यांना अत्याधुनिक शिक्षण मिळावे यासाठी १९९४मध्ये त्यांनी संस्थेच्या माध्यमातून चांगू काना ठाकूर विद्यालय नवीन पनवेलची स्थापना केली. इंग्रजी व मराठी माध्यमांची पूर्व प्राथमिक विभागापसून अगदी कनिष्ठ महाविद्यालयापर्यंत गरूडझेप या विद्यालयाने घेतली आहे. संगणक, माहिती तंत्रज्ञान, वाणिज्य, विज्ञान आणि कला या सर्वच शाखांमध्ये आधुनिक आणि पूरक शिक्षण देणारे हे ज्ञानमंदिर उभे आहे. या संकुलामध्ये आज जवळजवळ ६५०० विद्यार्थी आपले ज्ञानार्जन करीत आहेत.

प्राथमिक आणि विद्यालयीन शिक्षणाच्या यशस्वी कामगीरीनंतर त्यांनी आपली नजर उच्च शिक्षणाकडे केंद्रीत केली आणि १९९७मध्ये नवीन पनवेल येथे सिडकोच्या खांदा कॉलनी वसाहतीमध्ये चांगू काना ठाकूर आर्टस्, कॉमर्स अ‍ॅड सायन्स कॉलेज न्यू पनवेल या भव्य दिव्य शैक्षणिक संकुलाची मुहूर्तमेढ रोवली. आज हे महाविद्यालय परंपरागत शिक्षणाबरोबरच अत्याधुनिक शिक्षण देणारे मुंबई विद्यापीठातील प्रतिथयश शैक्षणिक केंद्र आहे. रसायनशास्त्र, सुक्ष्मजीवशास्त्र, हिंदी, इंग्रजी, अर्थशास्त्र, भूगोल, इतिहास, वाणिज्य या परंपरागत शाखांबरोबरच जीव तंत्रज्ञान, संगणक, माहिती तत्रंज्ञान, व्यवस्थापन, फिनानसीअल अकौंटन्सी, मार्केटिंग, फॅशन डिझायनिंग, इंटेरियर डिझायनिंग, डेटाअ‍ॅनालिटीक्स तसेच आर्टिफीशीअल इंटेलिजन्स व सायबर सेक्युरीटी यांसारख्या अत्याधुनिक क्षेत्रातील पदवी व पदव्युत्तर यांसारख्या विद्या शाखा सुरू करून विद्यार्थ्यांना व्यवसायाभिमुख बहुपर्यायी अभ्यासक्रम त्यांनी उपलब्ध करून दिले. या महाविद्यालयाने आपल्या कार्याचे रौप्य महोत्सवी वर्ष साजरे करून अनेक मानाचे तुरे आपल्या शिरपेचात रोवले आहेत. नॅकचे ए++ मानांकन, मुंबई विद्यापीठाचे सर्वोत्कृष्ट महाविद्यालय पारितोषिक आणि विद्यापीठ अनुदान आयोगाचे दोन वेळेस श्रेष्ठत्व सक्षम महाविद्यालय, राष्ट्रीय सेवा योजना, सांस्कृतिक व क्रीडा क्षेत्रातील विद्यापीठ, राज्य, राष्ट्रीय स्तरावरील चमकदार कामगिरी ही रामशेठ ठाकूरसाहेब यांच्या अचूक मार्गदर्शनाची उत्तम उदाहारणे आहेत. या महाविद्यालयातील एकूण पंधरा विद्यार्थ्यांनी मुंबई विद्यापीठाच्या तृतीय वर्ष परीक्षेतील गुणवत्ता यादीमध्ये सर्वप्रथम येऊन मुंबई विद्यापीठामध्ये महाविद्यालयाची विजयी पताका फडकावली व आपला ग्रामीण विद्यार्थीसुद्धा संधी मिळाली, तर आपल्या शैक्षणिक क्षमतेची चुणूक दाखवू शकतो हे दाखवून दिले. आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थिनीने मुंबई विद्यापीठामध्ये रसायनशास्त्र विषयामध्ये सर्वप्रथम येऊन मुंबई विद्यापीठातील १५० वर्षातील गुणांचा इतिहास बनवणे ही साधी गोष्ट नाही. आपल्या जीवनविकासासाठी झेप घेण्याची संधी रामशेठ ठाकूरसाहेबांनी इथल्या विद्यार्थ्यांना दिली आणि त्यामुळेच या पौरसरातील शिक्षण क्षेत्राचा परीघ बदलला. नवनवीन अभ्यासक्रम, अत्याधुनिक शिक्षासामुग्री आणि उच्चतम विद्याविभुषीत प्राध्यापक उपलब्ध करून दिल्यामुळेच इथल्या मातीचा सुगंध शहरातील वातावरणातही दरवळू लागला. रामशेठ ठाकूरसाहेबांच्या मार्गदर्शनामुळेच पदवी, पदव्युत्तर आणि पीएचडी पर्यंतचे शिक्षण येथे उपलब्ध झाले आहे. महाविद्यालयाची सातत्यपूर्ण गुणवत्ता व शैक्षणिक श्रेत्रामधील देदीप्यमान कामगिरी यांचा एकत्रित परिणाम म्हणून विद्यापीठ अनुदान आयोगाकडून महाविद्यालयास मानाचा स्वायत्त दर्जा प्राप्त झाला आहे.

नवीन पनवेलच्या खांदा वसाहतीमध्येच विद्यार्थी वकिली क्षेत्रात यावा म्हणून भागुबाई चांगू ठाकुर विधी महाविद्यालय न्यू पनवेलची स्थापन करून विद्यार्थ्यांना विधी शिक्षणाची सोय उपलब्ध करून दिली. या महाविद्यालयासही नॅकचे बी+ मानांकन मिळाले आहे. खारघर, नवी मुंबई येथे सीबीएसई बोर्डाचे रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल उभारले आहे. हे स्कूल फक्त नवी मुंबईमध्येच नव्हे तर मुंबईमध्येही एक प्रतिथयश स्कूल म्हणून नावारूपास आले आहे. ओवेपेठ येथील रामशेठ ठाकूर माध्यमिक विद्यालय, खारघर येथे उच्च शिक्षण क्षेत्रामध्ये गुणात्मक शिक्षण देण्यासाठी रामशेठ ठाकूर कॉलेज ऑफ कॉमर्स अ‍ॅन्ड सायन्स, खारघर (नॅकचे ए मानांकन) तसेच रामशेठ ठाकूर हायर सेकंडरी विद्यालय, खारघर या शाखांची स्थापनाही संस्थेच्या शैक्षणिक विस्तारामध्ये मानाचा तुरा गणली जात आहेत तसेच उरण परिसरातील द्रोणागिरी नोडमध्ये श्रीमती भागुबाई चांगू ठाकूर विद्यालय, द्रोणागिरी हे संकुल त्या परिसरातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची सुवर्णसंधी उपलब्ध करून देत आहे. भविष्यातील बदलांचा वेध घेऊन उलवे परिसरातील प्रगतीचा आढावा घेऊन संस्थेने या परिसरातील भूमिपुत्रांच्या, कष्टकऱ्यांच्या मुलांना उच्च दर्जाचे शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी सीबीएसई बोर्डाचे रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल उलवे हे विद्यालय संस्थेने सुरू केले. त्यामध्ये उच्च दर्जाच्या पायाभुत सुविधा व आधुनिक शैक्षणिक साधने उपलब्ध करून दिली आहेत.

संस्थेच्या कार्याचा प्रसार करताना रामशेठ ठाकूरसाहेबांनी सदैव इथला विद्यार्थी नजरेसमोर ठेवला. हा विद्यार्थी सर्वगुणसंपन्न व्हावा यासाठी त्यांनी कुठलीही तडजोड केली नाही. विद्यार्थ्यांसाठी दर्जेदार अत्याधुनिक आणि प्रशस्त शैक्षणिक संकुले निर्माण केली. उच्चशिक्षित, अनुभवी आणि हुशार शिक्षक व प्राध्यापकांची नेमणूक केली. आधुनिक उपकरणे आणि यंत्रसामुग्री उपलब्ध करून देण्यासाठी त्यांनी हात आखडता घेतला नाही.

व्यक्तींची गुणग्राहकता हा रामशेठ ठाकूरसाहेबांच्या व्यक्तिमत्वाचा मोठा गुण आहे. या गुणाव्दारे त्यांनी आपल्या संस्थेतील सेवकांना काम करण्यासाठी पूर्णपणे मोकळीक दिली. त्यांच्या कामकाजात कधीही ढवळाढवळ केली नाही. उलट त्यांच्यासाठी उच्चतम सोयीसुविधा उपलब्ध करून दिल्या. आजमितीस संस्थेच्या विविध शाखांमध्ये २१,००० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत तसेच १,१०० शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी शिक्षणदानाचे कार्य करत आहेत.

रामशेठ ठाकूरसाहेबांचे शिक्षण सेवाकार्य हे केवळ जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेपर्यंतच मर्यादित नाही. या संस्थेच्या चेअरमनपदाबरोबर आशिया खंडातील सर्वात मोठ्या रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य म्हणूनही ते जबाबदारी सांभाळत आहेत. 'रयत'ची महाविद्यालये आणि विद्यालये यांचा विकास होण्यासाठी त्यांनी सदैव अर्थिक मदत केली आहे. कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर विद्यालय हे स्टेट बोर्ड व सीबीएसई अभ्यासक्रम शिकविणारे एक आदर्श विद्यालय तसेच उलवे येथील शकुंतला रामशेठ ठाकूर हे सीबीएसई अभ्यासक्रम शिकविणारे विद्यालय त्यांनी तन-मन-धन समर्पित करून उभे केले आहे तसेच छत्रपती शिवाजी महाविद्यालय सातारा येथे रामशेठ ठाकूर भवन हे संकुल स्पर्धात्मक परीक्षेचे मार्गदर्शन देण्यासाठी त्यांनी स्वखार्चाने उभे केलेले आहे. त्यांचे हे रयत सेवाकार्य ही उल्लेखनीय आहे. नुकतेच पालघर जिल्ह्यातील मोखाडा या आदिवासी भागात लोकनेते रामशेठ ठाकूर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, मोखाडा हे संकूल पायाभूत व शैक्षणिक सुविधापूर्ण करून दिले.

तीक्ष्ण बुद्धीमत्ता थोरांप्रती आदर, लहानांप्रती प्रेम, दीनदुबळ्यांसाठी तळमळ, सतत काम करण्याची वृत्ती आदी गुणांमुळे रामशेठ ठाकूरसाहेब यांनी शिक्षण क्षेत्रातील केलेली भीम कामगिरी खरोखर अभिमानास्पद आहे. पनवेल-उरण आणि नवी मुंबईतील विद्यार्थ्यांना केजीपासून पीजीपर्यंत नव्हे तर अगदी पीएचडीपर्यंतचे शिक्षण आपल्या घरापासून काही अंतरावरच उपलब्ध करून दिले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांची पायपीट थांबली आणि त्यांना अभ्यासासाठी भरपूर वेळ प्राप्त होत आहे, विद्यार्थ्यांना हवी ती शाखा आणि विषय येथे उपलब्ध झाले आहेत.

शिक्षणप्रसाराबरोबरच सर्वात महत्वाचा मुद्दा म्हणजे या शैक्षणिक केंद्रामध्ये इथल्या हुशार आणि मेहनती स्थानिक वर्गांना उच्च प्रतीच्या नोकऱ्या उपलब्ध झाल्या. त्यामुळे इथल्या समाजाचा आर्थिक स्थरही उंचावला. एकंदरीत नवी मुंबई, पनवेल व उरण परिसरामध्ये अत्याधुनिक आणि २१व्या शतकाला साजेसे असे शैक्षणिक केंद्र निर्माण करणारे लोकनेते रामशेठ ठाकूरसाहेब हे इथल्या विद्यार्थी, पालक आणि समाजाच्या शैक्षणिक प्रगतीचे आधारवड झाले आहेत.


आज साहेबांच्या अमृत महोत्सवी वर्षातील पदार्पण व ७४व्या वाढदिवसानिमित्त मी आमच्या संस्थेतील सर्व प्राध्यापक, प्रशासकीय सेवक, शिक्षक व शिक्षकेतर सेवक व आजी माजी विद्यार्थ्यांच्या वतीने त्यांना शुभेच्छा देतो. त्यांना उदंड आयुष्य, किर्ती, यश मिळो ही ईश्वर चरणीप्रार्थना!

■ ■ ■




# माणसे जोडणारी प्रयोगशाळा

**प्रा.डी.ए. माने,** विसापूर, सांगली



माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर हे कोकणचे भुमिपूत्र आहेत. त्यांच्या जीवनाची सुरुवात अगदी शून्यातून झालेली आहे. मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर पुढच्या शिक्षणाचे काय? हा प्रश्न त्यांच्यासमोर उभा राहिला. त्यांना त्यांच्या सरांनी सांगितले, सातारला कर्मवीर भाऊराव पाटील त्यांनी स्थापन केलेले छत्रपती शिवाजी कॉलेज आहे. तेथे कमवा व शिका योजना आहे. तेथे स्वावलंबी शिक्षण घेता येते. रामशेठनी उच्च शिक्षणासाठी सातारला जाण्याचा निश्चय केला. ते पनवेल-रायगड-महाड-महाबळेश्वरमार्गे सातारला आले. त्यांच्या जीवनाची नवी अशी लंबी सफर सुरू झाली. सातारला त्या वेळी प्राचार्य बापूसाहेब उनउने छत्रपती शिवाजी कॉलेजचे प्राचार्य होते. प्राचार्यांनी रामशेठ यांना कमवा व शिका योजनेत प्रवेश दिला. कला शाखेच्या प्री डिग्रीच्या वर्गात त्यांनी प्रवेश घेतला.

रामशेठ ठाकूर यांना छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये शिक्षणाचे नवे दालन सापडले. आता आपले पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण होईल. या कल्पनेने त्यांना अतिशय आनंद झाला. तशात प्राचार्य एस.के. उनउने म्हणजे देवमाणूस होय. प्राचार्य उनउने कर्मवीरांचे खरे वारसदार होते. त्या उनउने बापूंची मायेची सावली रामशेठ ठाकूर यांना लाभली. त्यांच्या प्रेमळ सहवासात रामशेठ ठाकूर यांच्या जीवनाची जडणघडण सुरू झाली. १९६८ ते १९७२ अशी चार वर्षे बीएपर्यंतचे शिक्षण छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये घेतले. तेथे त्यांना उनउने बापूंनी आई-वडिलांचे प्रेम दिले. त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करताना रामशेठ ठाकूर यांनी म्हटले आहे. 'उनउने बापूंचा आदर्श घेऊन मी माझ्या आयुष्याची वाटचाल केली आहे. त्यांचा मला खूपच फायदा झाला आहे. बापूंच्या आचारविचारांचा प्रभाव आहे. त्यांचा मला चार वर्षे सहवास मिळाला. त्यामुळे माझे भविष्य घडले आहे.' अशा प्रकारे उनउने बापूंचा आणि कर्मवीर अण्णांच्या विचारांचा वारसा घेऊन त्यांच्या जीवनाची यशस्वी घोडदौड सुरू आहे.

कर्मवीर अण्णांना वाटायचे. माझ्या 'रयत'चे विद्यार्थी, बोर्डिंगचे विद्यार्थी, कमवा शिका योजनेचे विद्यार्थी दिल्लीच्या संसदेमध्ये जावेत. मला वाटते कर्मवीर अण्णांची ती इच्छा रामशेठ ठाकूर यांनी पूर्ण केली. ते दोन वेळा प्रचंड मतांनी विजयी होऊन लोकसभेत गेले. छत्रपती शिवाजी कॉलेजमधील कमवा व शिका योजनेतील एक सामान्य कुटुंबातील मुलगा संसद सदस्य झाला. भारताच्या लोकशाही मंदिराचा मानदंड झाला. रयतेचा झेंडा दिल्लीदरबारी फडकला. मला वाटते, आजच्या मंगलप्रसंगी ही आठवण आनंदाच्या डोही आनंद-तरंग निर्माण करणारी आहे. आज रामशेठ ठाकूर कर्तबगारीने श्रीमंत व्यक्ती बनले आहेत. श्रीमंत अनेकजण असतात, पण त्यातील फार थोडे दिलदार असतात. फार थोडे दानशूर असतात. हा दानशूरपणा संस्कार कर्मवार भाऊराव पाटील आणि त्यावेळचे प्राचार्य एस.के. उनउने यांच्याकडून त्यांना मिळाला आहे. प्राचार्य बापू ज्या मुलाकडे साबण नाही, तेल नाही, अंथरूण-पांघरूण नाही त्यांना पैसे द्यायचे. या सगळ्या घटनांचा त्यांच्या मनावर संस्कार झालेला आहे. त्यामुळेच आपणाला जे मिळाले आहे. त्यातील काही आपण दुसऱ्याला देत राहिले पाहिजे या भावनेने ते काम करत असतात, दान देत असतात. पुढील जीवनात जर्नादन भगतसाहेबांनीपण हेच संस्कार त्यांच्यावर केले आहेत. भगतसाहेबांच्यामुळेच रामशेठ ठाकूर राजकारण व समाजकारणाचे मानबिंदू ठरले आहे. त्यामुळे आजही शेकडो विद्यार्थी-पालक, संस्था चालक, वेगवेगळ्या मंडळांचे चालक, गरीब विद्यार्थी त्यांच्याकडे मदतीसाठी येतात आणि रामशेठ ठाकूर यथाशक्ती सर्वांनाच मदत करतात. 'कोणालाही विन्मुख पाठवायचे नाही' या ब्रीदवाक्याचे ते मानकरी ठरले आहेत.

आज रामशेठ ठाकूर हे अवघ्या रयत शिक्षण संस्थेला आपल्याच घरातला माणूस असे वाटतात. कर्मवीर अण्णांचा विचारांचा वारसा ते चालवित आहेत. रयत शिक्षण संस्थेचे आदरणीय अध्यक्ष शरद पवारसाहेब यांच्यासमवेत जीवाभावाचे सहकारी म्हणून 'रयत'चे काम करीत आहेत. 'रयत'च्या अनेक शाखांना लाखो-कोट्यवधींची मदत करत आहेत. संस्थेची अनेक विद्यामंदिरे, महाविद्यालये सुसज्ज बनली आहेत. रामशेठ ठाकूर सर्वांचेच आधारवड बनले आहेत.

रामशेठ ठाकूर आपल्या संस्कारशील कार्यामुळे तुमचे आमचे लोकनेते झालेले आहेत. जनतेने त्यांना लोकनेता ही बिरूदावली दिली आहे. त्यांना जनतेची-रयतेची कामे करण्यासाठी त्यांच्या सुविद्य पत्नी शकुंतला वहिनी, सुपूत्र आमदार प्रशांत ठाकूर आणि परेश ठाकूर यांची मोलाची साथ मिळते आहे. रामशेठ ठाकूर यांचा जीवन प्रवास आनंदाने, उत्तुंग ध्येयवादाने चालू आहे.

अशा प्रकारे रामशेठ ठाकूर कोकणचे भुमिपूत्र, पण आता ते केवळ कोकणचे राहिले नाहीत, तरच समस्त 'रयते'चे झाले आहेत. महाराष्ट्राचे सुपूत्र झाले आहेत. जनसामान्यांचे नेते झाले आहेत. सर्वांचे आधारवड झाले आहेत. याचे मुख्य कारण त्यांनी आपल्या प्रेमळ वागण्याने व नम्र स्वभावाने अनेक लहान थोर माणसांची अंतःकरणे जोडली आहेत. आज अवघ्या महाराष्ट्रात त्यांचा माणसांचा गोतावळा निर्माण झाला आहे. मी तर म्हणेन 'लोकनेते रामशेठ ठाकूर हे माणसे जोडणारी प्रयोगशाळा आहेत.'

*ऋणानुबंधाच्या जिथून पडल्या गाठी।*
*भेटीत तृष्ठता मोठी।।*

अशा ओळी कानावर पडताच जी माणसे माझ्यासमोर उभी राहतात त्यामध्ये लोकनेते रामशेठ ठाकूर प्रथम स्थानी असतात. काही काम असो नसो त्यांच्या भेटीची ओढ कायम असते. भेटल्यावर प्रसन्नता समाधान वाटते. असे माझ्याप्रमाणे अनेकांच्या मनातला माणूस म्हणजे रामशेठ ठाकूर होय. 'माणूस हा आपल्या भाग्याचा शिल्पकार आहे,' हे सुभाषित नक्की ज्याच्याबद्दल वापरावे असा आगळावेगळा माणूस म्हणजे रामशेठ ठाकूर होय.

रामशेठ यांचे जीवन पहाट ताऱ्यासारखे (शुक्रतारा) आहे. पहाट तारा हा पहाटे उगवतो. सर्वांना जागे करतो. पशू-पक्षी, शेतकरी, विद्यार्थी आणि अवघ्या अवघ्यांना जागे करतो. आपले मंगल दर्शन सर्वांना घडवितो. रात्र संपली आहे. असा अवघ्या विश्वाला सुचवितो. सर्वांना उषःकालची चाहूल देतो. सामाजिक, राजकीय, औद्योगिक आणि शैक्षणिक परंपरेतील हा पहाट तारा सर्वांना दीपस्तंभासारखा मार्गदर्शक आहे. रामशेठ ठाकूर यांच्या जीवनाचे सार सांगायचे तर ते पारिजातकाचे झाड आहेत. त्यांच्या कार्याचा किर्ती सुगंध सर्वत्र दरवळत आहे.

■ ■ ■



# घ्यावा परोपकाराचा वसा

**प्रा.डॉ.विजयकुमार रणदिवे,** पनवेल

*सूर्यही देशील तू।*
*पणती कशी मागू तुला?*
*देणे प्रकाशाचे तुझे।*
*जे सकलासि देसी।*
*ते देई मला।।*

सुप्रसिद्ध लेखक प्रशांत पितालिया म्हणतात, 'स्वत:चा देह जर दुसऱ्यांचे कल्याण साधणार असेल तर त्याग करणारे दधिची, स्वत:ची कवच कुंडले काढून देणारा दाता कर्ण भारताच्या परंपरेत दातृत्वाची अशी अनमोल उदाहरणे आहेत, दातृत्वाचे मानदंड आहेत.' यामध्ये माजी लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे नाव आधुनिक कर्ण म्हणून घेतले पाहिजे. ते म्हणतात, दातृत्व हा माझा स्थायीभाव आहे. त्यातून मला सामाजिक ऋणातून मुक्त होण्याचं आत्मिक समाधान मिळतं. पैशापेक्षा हे समाधान मी लाख मोलाचं मानतो. आई-वडिलांच्या संस्कारामुळेच माझ्यात दातृत्वभाव रुजला.'

लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे महाविद्यालयीन शिक्षण छत्रपती शिवाजी कॉलेज सातारा येथे कर्मवीर अण्णांच्या 'कमवा व शिका' योजनेतून झालेले आहे. २०२४-२०२५मध्ये सुरू करण्यात आलेल्या बीए हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरिंग या तीन वर्षाच्या अभ्यासक्रमासाठी आवश्यक असणाऱ्या लॅब व हॉल उभारणीसाठी त्यांनी १५ लाख रुपयांची देणगी दिली. यापूर्वी शिवाजी कॉलेज येथे सहा कोटी ८७ लाख रुपये खर्चून भव्य भवन बांधून दिले आहे.

रयत शिक्षण संस्थेच्या प्रगतीसाठी स्वत:च्या दातृत्वाने शंभर कोटींहून अधिक रुपयांची आर्थिक मदत करणारे रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार थोर देणगीदार लोकनेते रामशेठ ठाकूर व त्यांच्या सुविद्य पत्नी शकुंतला ठाकूर यांनी यंदाही रयत शिक्षण संस्थेच्या विकासासाठी दोन कोटी १२ लाख रुपयांची देणगी दिली आहे. त्याबद्दल त्यांचा रयत शिक्षण संस्थेच्या वतीने



संस्थेचे अध्यक्ष शरद पवार यांच्या हस्ते सातारा येथे कर्मवीर भूमीत हृद्य सत्कार करण्यात आला.

श्री समर्थ म्हणतात, 'आपण शरीराने, मनाने व धनाने जनसामान्यांसाठी झिजलो नाही, तर कधीही कीर्ती प्राप्त करू शकत नाही.'

*राखावी बहुतांची अंतरे।*
*भाग्य येते तदनंतरे।*

फक्त स्वत:चाच विचार करू नये. जी माणसं आपल्या प्रमाणेच इतरांचाही विचार करतात ती माणसं वेगळी असतात. सकारात्मक दृष्टिकोन आणि परोपकाराची प्रवृत्ती माणसाला लोकप्रिय बनवते. अशी माणसे चहुकडे आनंद उधळत चालतात.

'दिल्याने मिळते' हा सृष्टीचा नियम आहे. म्हणूनच म्हणतात 'दान दिये धन ना घटे'. तोंडचा घास अतिथीला दिल्यास दुवा मिळतात. आशीर्वादामागोमाग समृद्धीही येते. परोपकार ही लोकनेते रामशेठ ठाकूर यांची आंतरिक ताकद आहे. जीवनात निस्वार्थ भावनेला जागा देणे ही सर्वात महत्त्वाची जबाबदारी आहे, असे ते मानतात. सदाचार, स्वार्थ त्याग, समाजनिष्ठा या मूल्यांची अत्यंत गरज आहे, असे त्यांचे मत आहे.

आपल्या परिचयाचे किती लोक अडचणीत असतात, दु:खात असतात, आजारी असतात. आपण त्यांना धीर देऊ शकतो, सांत्वन करू शकतो. जम्मू काश्मिरमधील पहलगाम येथे दहशतवाद्यांच्या हल्ल्यात नवीन पनवेल येथील रहिवासी दिलीप देसले मृत्युमुखी पडले. त्यांच्या शोकाकुल कुटुंबाची लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भेट घेत सांत्वन केले. 'मी देसले कुटुंबियांच्या सोबत आहे. कोणतीही मदत भासल्यास माझ्या घराचे दरवाजे कायम उघडे आहेत,' असे लोकनेते रामशेठ ठाकूर म्हणाले.

एखाद्या व्यक्तीला शुभेच्छा देणे, त्याला मिळालेल्या यशाबद्दल त्यांचे अभिनंदन करणे यामुळे त्याच्या जीवनात आनंद येऊ शकतो. कुटुंबातील सदस्य असो अथवा समाज घटक असो, खेळाडू, गायक, चित्रकार, वक्ता, बुद्धीमान विद्यार्थी-विद्यार्थिनी, अथवा शिक्षक असो कौतुकाची, प्रोत्साहनाची, शाबासकीची थाप पाठीवर पडल्यास ते बरेच काही करू शकतात. एखाद्याला प्रोत्साहन देणे, त्याचे कौतुक करणे या गोष्टी त्याच्या प्रगतीच्या दृष्टीनं महत्त्वाच्या आहेत. लोकनेते रामशेठ ठाकूर नेहमी इतरांचे मन:पूर्वक व उदारपणे कौतुक करतात. मूल्यवान हिऱ्याला पैलू पाडण्याचे काम ते करतात. त्यामुळेच हिरा चमकतो. आदरणीय लोकनेते रामशेठ ठाकूर यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

■■■

# बहुआयामी, करूणाशील, विवेकी नेतृत्व



**-प्रा.डॉ. सुभाष वाघमारे,**
**मराठी विभाग प्रमुख व संचालक, भाषा मंडळ, कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ, सातारा**

कर्मवीरांनी स्थापन केलेल्या रयत शिक्षण संस्थेच्या छत्रपती शिवाजी कॉलेजचे आमच्या मराठी विभागाचे विद्यार्थी लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा दातृत्वाचा आदर्श सर्व जगभरातील व्यक्तींनी घ्यायला हवा असे हे व्यक्तिमत्व आहे. सातारा येथे 'शोध मराठी मनाचा' २०वे जागतिक मराठी संमेलन जागतिक मराठी अकादमी व रयत शिक्षण संस्थेने घेतले तेव्हा मा. खासदार शरदचंद्रजी पवार म्हणाले होते, की जगात विविध ठिकाणी विविध क्षेत्रात कर्तृत्व दाखवणाऱ्या सर्व मराठी माणसांनी रामशेठ ठाकूर यांना भेटले पाहिजे, त्यांचे कार्य समजून घेतले पाहिजे.

अलीकडे पवारसाहेबांच्या कोणत्याही भाषणात रामशेठ यांचे नाव सतत असते. त्याचे कारण सर्वांना विदीत आहे. रामशेठ यांचा प्रत्येक श्वास लोकहितासाठी आहे हे आम्हाला सतत जाणवत राहते. प्राचार्य शंकरराव उर्फ बापूसाहेब उनउने हे त्यांचे आदर्श आहेत. लोकनेते रामशेठ यांनी मॅट्रिक परीक्षा पास झाल्यानंतर मुंबई, पुणे इथे न जाता सातारा येथे छत्रपती शिवाजी कॉलेज येथे प्रवेश घेतला. १५ जून १९६८ ते २४ ऑगस्ट १९७२ या काळात ते छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये शिक्षण घेत होते. पदवीला मराठी विषय घेतलेला हा विद्यार्थी प्रामाणिक, कष्टाळू, विनम्र आणि सामाजिक जाणीव असणारा लोकनेता झाला. याला कारण त्यांचे आई-वडील यांचे संस्कार आहेत तसेच कर्मवीर भाऊराव पाटील यांचा आदर्श हे कारण आहे. मराठी विभागात प्राचार्य शंकरराव उनउने बापू, द.ता. भोसले, मंचरकर किंवा अन्य मराठीचे प्राध्यापक त्यांना लाभले. या सर्वात उनउने बापूंच्या विद्यार्थ्यांविषयी असलेल्या कळवळ्याचा प्रभाव आजही त्यांच्या व्यक्तिमत्वात आहे. संत साहित्य मराठीतून तळमळीने शिकवणारे बापू यांचा नैतिक आदर्श त्यांच्या व्यक्तीमत्वात आहे. पैसे येतात किती आणि जातात किती गणती नाही, पण संतासारखे हे व्यक्तिमत्व संयमी आणि नम्र आहे. काम चांगले होण्याच्या ध्यासाने त्यांचे अंत:करण भरलेले असते. सत्संग, सत्कृती ही जाणीवेने करावी आणि सार्वजनिक हिताचे कोणतेही काम असेल तर तुम्ही का असेहीही मागा, ते देणार हे निश्चित आहे. कमवा आणि शिका योजनेत त्यांचे शिक्षण काही काळ झाले हे खरे आहे, पण त्यांच्या विद्यालयीन शिक्षण घेण्याच्या काळातच त्यांना कष्टाची सवय लागलेली होती. त्यांचे वडील काम करीत तिथे ते काम करीत होते. आम्ही मराठी विभागाने प्राचार्य शंकरराव उनउने यांच्या नावाने बोलीभाषा कविता लेखन स्पर्धा घेतली. तिच्या पारितोषिक वितरण समारंभास रामशेठ उपस्थित होते. त्या वेळी त्यांनी केलेले भाषण एक ऐतिहासिक व अविस्मरणीय असे भाषण आहे. ते म्हणाले...


'मित्रांनो! आम्ही शाहू, फुले आंबेडकरांच्या दिंडीतील वारकरी आहोत. देवावर भक्ती आहे. सर्वांना समता, स्वातंत्र्य, समानता, बंधूभाव हे सर्व राज्य घटनेत आहे. संविधानावर आमची भक्ती आहे. प्राचार्य बापूसाहेब उनउने हेच माझे खरे गुरू होते. जीवनात मी आदर्श मानतो त्यात ते कर्मवीर अण्णा, शाहू, फुले, आंबेडकर ही देशाची दैवते आहेत. 'पीडी'पासून पुढे चार वर्षे मी छत्रपती शिवाजी कॉलेजला शिकलो, त्या वेळी आम्हाला एस.के. उनउने हे प्राचार्य होते. माझा मराठी हा स्पेशल विषय होता. शेवटच्या वर्षाला महाराष्ट्राची संत परंपरा नावाचा पेपर ते शिकवित. ते केवळ पुस्तक शिकवत नसत तर प्रत्यक्ष वागत असत. द.ता. भोसले नाटक शिकवायचे. दोन वाक्य चार वाक्य ते उद्घोषित करायचे. त्यामुळे मराठीची आम्हाला माझी आवड वाढली आणि मला शिक्षकच व्हायला पाहिजे अशी इच्छा त्यावेळी झाली. मी प्रथम शिक्षक झालो, पुढे उद्योगपती झालो तरीही माझा पाया हा छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये रचला गेला हे मला जाणवते.'

आई भागुबाई व वडील चांगू ठाकूर यांच्यातील सद्गुणांचा परिपाक म्हणजे रामशेठ आहेत. आजच्या काळात त्यांचे चारित्र्य हा जनमानसाचा आदर्श आहे. कोणालाही मदत करणारा उदार मनाचा सहृदयी माणूस म्हणून त्यांच्याकडे कृतज्ञतेने लोक पाहतात. कोणत्याही हेवादाव्यात न रमता विधायक कृती करण्यासाठी त्यांचे मन ओढ घेत असते. मानवी स्नेहसबंध कसे जपावेत याचा आदर्श रामशेठ आहेत. अविश्रांत कामात मग्न राहणारे ही एक विधायक ऊर्जा आहे, तर चुकीच्या गोष्टी होणारच नाहीत याची काळजी घेणारे ते विवेकी व्यक्तिमत्व आहे. त्यांना खूप आयुष्य लाभो याच माझ्या वाढदिवसाच्या निमित्ताने शुभेच्छा!

■■■

# समर्पित नेतृत्व

**हरेश महादेव साठे**



लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा दानशुरपणा सर्वांना परिचित आहे आणि त्या अनुषंगाने एक श्लोक आहे. शंभरामध्ये एक शुर असू शकतो, हजारामध्ये एखादा पंडित असू शकतो, दहा हजारामध्ये एखादा वक्ता असू शकतो आणि लाखात एखादा दाता असू शकतो. आणि हीच गोष्ट लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या रूपाने समाजाला मिळाली आहे. त्यांची कीर्ती, कार्याचा आदर्श एवढा मोठा आहे की, त्यांच्या शिकवणीतून अनेक जण शिक्षित झाले आणि त्यांनीही त्यांच्या पाऊलांवर पाऊल टाकत समाजसेवेचे व्रत हाती घेतले आहे.

'उघडले भांडार, धन्याचा माल, मी तो हमाल, भार वाही' या संत ज्ञानेश्वराच्या अभंगाप्रमाणे माझ्याकडे जो पैसा आहे त्याचा मी फक्त विश्वस्त आहे. समाजामध्ये जे पिडीत आहेत, शोषीत आहेत, दु:खी आहेत त्यांना आर्थिक मदत करणे ही ईश्वरसेवा आहे, आणि हे मानूनच लोकनेते रामशेठ ठाकूर काम करीत असतात, त्यामुळे आपल्याकडे असलेले समाजाला देण्याचे काम ते करतात त्यामुळे त्यांच्याकडे समर्पण भावना कायम रुजली आहे.

जिद्द, चिकाटी, प्रामाणिकपणा, कठोर परिश्रम घेण्याची तयारी या गुणांचे बाळकडू त्यांना लहान वयातच आई-बाबांकडून मिळाले होते. त्यामुळे जीवनातील संघर्षाला तोंड देत असताना आपल्या अंतर्मनात शिक्षणाविषयीची आस त्यांनी जागृत ठेवली. पद्मभूषण कर्मवीर भाऊराव पाटील यांची शिकवण लोकनेते रामशेठ ठाकूर यांना मिळाली. रयत शिक्षण संस्थेच्या सातारा येथील विद्यालयात त्यांनी 'कमवा आणि शिका' या तत्त्वाने आपले शिक्षण पूर्ण केले. स्वत:ची जनार्दन भगत शिक्षण प्रसारक शिक्षण संस्था असताना त्यांचे प्रेम रयत शिक्षण संस्थेवर अधिक राहिले आहे. त्यामुळे ते रयत शिक्षण संस्थेला मातृसंस्था मानून काम करत असतात. त्यांनी शिक्षणाची जाण ठेवत या संस्थेच्या सक्षमीकरणासाठी सातत्याने मदतीचा हात देऊ केला आहे. त्यांच्या कार्याचा गौरव सर्वत्र होत असून रयत शिक्षण संस्थेनेही लोकनेते रामशेठ ठाकूर भवन, अनेक विद्यालय, महाविद्यालयांना देऊन त्यांच्या कार्याची पावतीच दिली आहे. कष्टकरी, गोरगरीब घरातील मुलांना शिक्षण मिळावे, यासाठी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या माध्यमातून उभे केलेल्या विद्यालयांमुळे कष्टकरी माणसांच्या झोपडीपर्यंत इंग्रजी भाषेचे ज्ञान आणि आधुनिक शिक्षण पोहचले आहे.

समाजातील सर्वसामान्य माणसांच्या न्याय हक्कासाठी सतत पुढे राहणे, प्रसंगी स्वजनांशी संघर्ष करणे हा लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा स्थायीभाव. केवळ समाजासाठी जगणारे लोकमान्य लोकनेता म्हणून त्यांची संपूर्ण महाराष्ट्रात ओळख निर्माण झाली आहे. सामाजिक बांधिलकी, दूरदृष्टी, सकारात्मक विचारसरणी, कठोर परिश्रम घेण्याची तयारी, प्रामाणिकपणा, अचूक निर्णय क्षमता, कर्तव्यनिष्ठा, श्रद्धा या गुणांमुळे लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी समाजजीवनातील यशाची शिखरे पादाक्रांत केली आहेत.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांची लोकांप्रती असलेली समर्पण भावना सुवर्णाक्षरांचे पान आहे. त्यांची किर्ती महान व सर्व समाजाला मार्गदर्शक आहे. सर्वसामान्यांचे आधारवड असलेले लोकनेते रामशेठ ठाकूर यांना वाढदिवसानिमित्त निरोगी व दीर्घायुष्य लाभो, ही प्रार्थना!

■■■

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे सदैव समाजकल्याणाला प्राधान्य

**पान ३ वरून..**

आज वयाच्या ७४व्या वर्षीसुद्धा कष्ट करण्याची त्यांच्यात जिद्द व ताकद आहे. त्यांनी एकदा ठरवले की मला हे काम पूर्ण करायचे आहे, तर चिकाटी, वेळ, कामाचे नियोजन; त्याचबरोबर आपल्यासोबत असणाऱ्या छोट्या मोठ्या सर्व सहकाऱ्यांना घेऊन त्या कामाला सिद्धीपर्यंत पोहचवण्यासाठी ते रात्रीचा दिवस करतात. त्यांनी त्यांच्या जीवनात शिक्षक म्हणून केलेली सुरुवात आणि आज रायगड असेल किंवा ठाणे जिल्ह्यात ज्यांना ज्ञानमंदिर म्हटले जाते अशा वास्तू निर्माणामध्ये त्यांनी दिलेले योगदान महत्त्वपूर्ण असून तेथे विविध क्षेत्रांमध्ये असणारे विद्यार्थी उच्च शिक्षण घेत आहेत. दानशूरपणा, सामाजिक तळमळ अशा बऱ्याचशा गोष्टी त्यांच्याकडून शिकण्यासारख्या आहेत. एक फार मोठा वारसा त्यांनी सर्वांना दिलेला आहे आणि हा वारसा खऱ्या अर्थाने पुढे नेणे हे अत्यंत गरजेचे आहे, असे चव्हाण यांनी सांगितले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३००व्या जयंतीच्या निमित्ताने सांगतो की, परकियांनी आपली श्रद्धास्थाने तेव्हा भंग करण्याचे काम केले आणि त्यानंतरच्या काळात राजमाता अहिल्यादेवींनी मंदिरांचे जतन व संवर्धन केले. लोकनेते रामशेठ ठाकूर यांनीही रायगडसह जवळपास असणाऱ्या जिल्ह्यांमध्ये मंदिरांच्या निर्माणासाठी योगदान दिले आहे. या कीर्तन महोत्सवाच्या निमित्ताने वैष्णवांचा मेळा येथे जमला आहे. वारकरी सांप्रदाय आणि परंपरा टिकवून ठेवण्यासाठी त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याची गरज असते. लोकनेते रामशेठ ठाकूर नेहमी वारकरी मंडळींच्या पाठीशी राहिले आहेत. त्यांच्याकडून विचार व आदर्शाचा वारसा मिळाला आहे. लोकनेते रामशेठ ठाकूर यांना निरोगी दीर्घायुष्य लाभो ही प्रार्थना ईश्वराकडे करतो, असेही चव्हाण यांनी नमूद केले.












# पनवेल महानगरपालिका

**ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६**

## ऑफलाईन निविदा सुचना

### मलनि:स्सारण विभाग

मा. आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांच्या वतीने ऑफलाईन निविदा ब- १ नमुन्यातील खालील नमूद कामांची निविदा महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदाराकडुन मागविण्यात येतआहे.

| अ क्र | निविदा क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम रु. (GST सोडुन) | निविदा अनामत रक्कम (रु) | कोरी निविदा किंमत (रु) |
|---|---|---|---|---|---|
| १. | पमपा/मल. वि/१५/२०२५-२६ | पनवेल महानगरपालिका हद्दीतील नविन पनवेल येथील पीएल ५ बिल्डींग १ पासुन ते उत्सव हॉटेलपर्यंताची मधील गल्ली पेव्हर ब्लॉक बसविणे. (मा. आमदार श्री. प्रशांत रामशेठ ठाकुर यांच्या आमदार निधीतुन सन २०२४-२५) | ४,००,९१०/- | ४,१००/- | ५९०/- |
| २. | पमपा/मल. वि/१८/२०२५-२६ | पनवेल महानगरपालिका हद्दीतील नविन पनवेल येथील सीकेटी शाळा ते बिकानेर पर्यंत फुटपाथवर पेव्हर ब्लॉक बसविणे. (मा. आमदार श्री. प्रशांत रामशेठ ठाकुर यांच्या आमदार निधीतुन सन २०२४-२५) | ४,०५,०३९/- | ४,०५०/- | ५९०/- |
| ३. | पमपा/मल. वि/२२/२०२५-२६ | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र. १६ राजीव गांधी मैदान येथे हायमास्ट बसविणे. (मा. आमदार श्री. प्रशांत रामशेठ ठाकुर यांच्या आमदार निधीतुन सन २०२४-२५) | ४,८६,३४६/- | ४,९००/- | ५९०/- |
| ४ | पमपा/मल. वि/२१/२०२५-२६ | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.१८ राजहंस सोसायटी ते स्वप्न रेखा सोसायटी पर्यंत विद्युत खांब उभारणे. (मा. आमदार श्री. प्रशांत रामशेठ ठाकुर यांच्या आमदार निधीतुन सन २०२४-२५) | ३,८३,१२९/- | ३,९००/- | ५९०/- |

१. या कामी निविदा प्रपत्र रोख रक्कम भरणा करून दिनांक. ०२/०६/२०२५ पासून दि. १०/०६/२०२५ पर्यंत सायं ३.०० वाजेपर्यत (कार्यालयीन वेळेत) पनवेल महानगरपालिका मलनि:स्सारण विभागात उपलब्ध होतील.
२. अनामत रक्कमेचा डिमांड ड्राफ्ट निविदेसोबत, लखोटा क्रं. १ मध्ये सादर करण्याचा आहे.
३. सीलबंद निविदा दिनांक. १०/०६/२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत पनवेल महानगरपालिकेच्या मलनि:स्सारण विभागात स्विकारण्यात येतील.
४. प्राप्त झालेल्या निविदा शक्य असेल तर दि. १०/०६/२०२५ रोजी दुपारी ३.०० नंतर शहर अभियंता यांच्या दालनात उपस्थित ठेकेदार यांच्या समक्ष उघडण्यात येतील.
५. प्राप्त निविदेतील १ अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता मंजूर अथवा नामंजूर करण्याचा हक्क पनवेल महानगरपालिकेने राखून ठेवला आहे.

**सही/-**
**शहर अभियंता**
**पनवेल महानगरपालिका**

**जा.क्र.पमपा/जनसंपर्क/३१२५/प्र.क्र.२३३/२३५/२०२५**
**दिनांक :- ३०/०५/२०२५**